मुस्लिम

सत्यशोधक,

ए. बी. शहा

आणि

युगांतर

# माणूस

शनिवार

२९ डिसेंबर

१९७३

पन्नास

पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

२९ डिसेंबर १९७३

# माणूस

वर्ष : तेरावे । अंक : एकतिसावा

## सप्रेम नमस्कार....

**१ डिसेंबर १९७३**

¤ माणूस (साप्ताहिक) एक डिसेंबरच्या अंकातील 'एक भिकार विशेषांक' ही संपादकीय टीप आणि 'मुस्लीम सत्यशोधक चळवळ, तीन वर्षांच्या कार्याचा जमाखर्च' हा लेख वाचला. 'युगांतर'चा तो विशेषांक माझ्या वाचण्यात नाही. आदली टीप वाचून त्या अंकाविषयी फारच प्रतिकूल मत झाले, पण आपणच उधृत केलेला लेख वाचून मात्र त्याच अंकाविषयी फार अनुकूल मत झाले.

मुस्लीम सत्यशोधक चळवळीवर लेखात तीन आक्षेप घेतले आहेत. ते असे—

१ : मुस्लिमातील सनातनी वृत्ती उखडण्यासाठी ही चळवळ हिंदू सनातन्यांचा पाठिंबा मिळवीत आहे. हिंदू सनातन्यांचा हा पाठिंबा म्हणजे एक पवित्रा आहे, मुस्लिमांना 'एक्सपोज' करण्यासाठी मुस्लिमांचा वापर करण्याचा तो डाव आहे. त्यामागे मुस्लिमांतील सामाजिक परिवर्तनाची पोटतिडीक नाही.

२ : अमेरिका धार्जिणे प्रा. अ. भि. शहा यांच्याकडे या चळवळीचे नेतृत्त्व जाणे धोक्याचे आहे. कारण शहामहाशय या चळवळीच्या खऱ्या मित्रांना दूर लोटीत आहेत.

३ : या चळवळीने मुल्ला-मौलवींना दुखविले पण मुस्लिमातील पुरोगामी वर्गांना जवळ केले नाही. उलट चळवळीला हिंदू सनातन्यांचा पाठिंबा मिळविल्याने कर्मठ मुसलमान या चळवळीविषयी अधिक साशंक बनले.

यांपैकी दुसऱ्या आक्षेपाविषयी मी साशंक आहे. कारण शहामहाशय त्यांच्या प्रतिपादनात धर्मनिरपेक्षता जोपासताना दिसतात. पण त्यांच्या अमेरिकाधार्जिण्या वृत्तीविषयी मला माहिती नाही. उरलेल्या दोन आक्षेपात मात्र मला तथ्य दिसते. आणि हे आक्षेप अनेकांच्या मनात आहेत. चळवळीचे प्रवर्तक हमीद दलवाई यांनी केलेल्या कार्याची जमेची बाजूही लेखात मान्य करण्यात आली आहे. मात्र

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

दलवाईंची चळवळ प्रत्यक्ष समाजात उतरल्यानंतर तिच्यात, कदाचित त्यांच्याही नकळत, वरील दोन आक्षेपातील दोष उतरले आहेत आणि म्हणूनच या चळवळीविषयी खरोखर आस्था असणाऱ्या सनातनी हिंदू मंडळींनी तरी निदान तिच्यापासून अलिप्त रहाण्यातच या चळवळीचे हित आहे.

मला वाटतं, या लेखात चळवळीकडे वास्तव दृष्टिकोनातून पाहिलेले असून तिच्यातील नेमक्या दोषांवर बोट ठेवण्यात आले आहे. असा लेख लिहीत असताना लेखकाचे काही पूर्वग्रहही व्यक्त झाल्यास ते बाजूस सारून गाभ्याकडे पाहिले पाहिजे असा लेख.

**रवीन्द्र घवी,** पणजी

**२४ डिसेंबर, ७३**

□ माणूसच्या २२ डिसेंबरच्या अंकातील सु. ल. सोमण यांचा 'मग बेळगावला उशीर का ?' हा लेख कर्नाटकी माणसांचे मनोगत योग्य प्रकारे व्यक्त करीत आहे.

त्यांनी सुचवलेला पर्याय मात्र कुणालाच मान्य होणारा नाही. गोव्यासकट नवा प्रांत करून मूळ भाषिक प्रश्न सुटणार नाही. द्वैभाषिक मुंबई प्रांताचे शेवटी विभाजन करावे लागले हा अनुभव विसरता कामा नये. तसेच एस. एम. जोशी यांनी मांडलेला बेळगाव केंद्रशासित ठेवण्याचा उपाय ही प्रश्नाला सामोरे न जाता केवळ पळवाट आहे.

महाजन-ॲवॉर्डमुळे कर्नाटकचे बरेच आर्थिक नुकसान होणारे आहे. तरीही त्यांनी हा ॲवॉर्ड मानलेला आहे. केवळ बेळगाव शहरापुरता तो आपल्याविरुद्ध गेला म्हणून नाकारणे महाराष्ट्राला भूषणावह नाही.

महाराष्ट्रीयांना बेळगावचा व बेळगावातील मराठी लोकांना महाराष्ट्राचा पुळकाच असेल तर त्यांनी कर्नाटकाच्या सीमेवर नवे बेळगाव वसवावे. विक्रीकरातून सुटका व्हावी यासाठी निपाणीजवळ अर्जुननगर होऊ शकते तर नवे बेळगाव उभे करायला कोणताच प्रत्यवाय नाही.

सर्वांत मूळ प्रश्न सीमेचा नसून अल्पसंख्यांकाना आपली भाषा जोपासण्याला, शिक्षणाला व व्यवसायाला वाव देणे हा आहे. सीमा केव्हाही सरकणारी आहे. पण हा प्रश्न कायम आहे. तेव्हा हा वाव कसा देता येईल, अल्पसंख्यांकांच्या जीवितवित्ताला कसे संरक्षण देता येईल, त्यांचा कसा विकास होऊ शकेल या मूलभूत प्रश्नाचा दोन्ही राज्यसरकारांनी विचार करायला हवा.

भाषिक विद्वेष परस्परांच्या हानीमुळे वाढणारा. त्यावर. कदाचित कायमचा उपाय लोकसंख्येची अदलाबदल करणे हा होऊ शकेल. मग एक भारत देश कुठे राहिला ?

**सी. पं. खेर,** धारवाड

वेगळ्या दृष्टिकोनातून

# मिकी आणि मेमसाब

## डॉ. उल्हास लुकतुके

तो गोरा नाकेला तरुण म्हणाला, 'मिकी आणि मेमसाहेब ना, ग्रँड आउटस्टँडिंग.' सदर तरुण नाटकाच्या क्षेत्रात चांगला मुरलेला आहे. मातब्बर व्यक्तीच्या हाताखाली अभिनयाचे धडे घेतलेला आणि मनोविकार शास्त्राची पदविका लवकरच मिळवू घातलेला माणूस असे म्हणतो असे म्हटल्यावर माझे कुतूहल जास्तच वाढले. दुसरे एक डॉक्टर आहेत. अत्यंत वादग्रस्त नाटकांवरील त्यांची समीक्षणे गाजलेली आहेत. सध्याही वृत्तपत्रीय 'रिपोर्ट' बद्दल त्यांचे नाव दुमदुमत असते. ते म्हणाले, 'छान वाटले बुवा. पण आऊटस्टँडिंग वगैरे काही नाही.' आता झाली का पंचाईत. खरे तर एक पथ्य मी पाळतो. जी नाटके मला गंभीरतेने घ्यावीशी वाटतात त्या नाटकांचा प्रयोग पहाण्याअगोदर कोणाची मते ऐकणे अथवा परीक्षणे वाचणे मी आग्रहाने टाळतो. पण ही रोजच्या भेटीगाठीतली मंडळी. सहज 'काय, कसे काय?' म्हणता म्हणता एवढे कानावर पडले. तोपर्यंत निकाल कळला. पुणे केंद्रात थिएटर अॅकॅडमीचे 'मिकी आणि मेमसाहेब' पहिले आले. 'घाशीराम कोतवाल' नंतरच्या फाटाफुटीनंतर या तरुण तुर्कांना ज्या यशाची आवश्यकता होती ते रुढार्थाचे यश त्यांच्या पदरी पडले. वाटले, थोड्या काळात या गटाने बरीच वाटचाल केली की. सतीश आळेकरांच्या विद्यार्थी दशेतील काही एकांकिका मी पाहिल्या होत्या. म्हटले या तरुणानेही बरीच मजल मारली की, आणि लगेच पुढचा प्रयोग जो लागला त्याला जाऊन बसलो.

'मिकी आणि मेमसाहेब'ची कथा घटनांच्या मालिकेत सांगण्याजोगी नाही. कारण काही घटना घडतात तर काही आभास आहेत. आणि कुठली घटना व कुठला आभास यात वाद होण्याजोगा आहे. कथासूत्र सांगायचे म्हटले तर पन्नाशीच्या आसपासचा एक विद्वान प्रोफेसर, त्याची तरुण, तेजस्वी बायको

यांच्यातले हे एनकाऊंटर आहे. प्रोफेसरचा सत्य परिस्थितीशी संबंध सुटत चाललेला आहे. आभास आणि सत्य यामध्ये त्याची ये जा चालू आहे. त्याला आभासमय जगात ढकलण्यासाठी ही प्रभुत्त्वशील, आक्रमक पत्नी बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. प्रोफेसर उघड उघड हरणारी लढाई खेळतो आणि शेवटी कायमचा सत्यापासून तुटतो, आणि स्वतःच्याच जगात पुनः कधीच बाहेर न येण्यासाठी बुडी मारतो. दोन व्यक्तिमत्त्वांचा संघर्ष. एका व्यक्तिमत्त्वाने आपल्या वृत्तींचे सब्लिमेशन केलेले आणि एक उघड उघड नैसर्गिक स्त्रीत्त्वाच्या गुणवैशिष्टयांचे भांडवल करणारे सब्लाईम व्यक्तिमत्त्व हरते. खरे म्हणजे यातून मन खिन्न करणारे एक नाटय उभे राहयला हवे होते. पण घडले थोडे वेगळेच. नाटकाच्या शेवटी प्रोफेसराबद्दल दया, अनुकंपा वाटली. आणि ज्या ॲब्सर्डिटीच्या पायावर नाटक चालू झाले तो पायाच शेवटी ढासळला. पूर्वीच्या नाटकात किंवा अजूनही हिंदी सिनेमात नायिका सद्‌गुणांची पुतळी असते. खलनायक दुर्गुणी असतो. आणि त्या प्रसिद्ध बलात्काराच्या दृश्यात नायिका प्रेक्षकांची सहानुभूती खाऊन जाते. त्यापेक्षा वेगळे काही या नाटकात घडले नाही. फरक एवढाच की नायिकेच्या जागी होता प्रोफेसर व खलनायकाच्या जागी होती त्याची पत्नी.

नाटकातील प्रमुख नट डॉ. मोहन आगाशे यांच्याशी माझे थोडे बोलणे झाले. इतर संबंधितांशीही थोडेफार बोललो. 'मनोविकार शास्त्राच्या दृष्टीने नाटकाकडे पाहू नका, थिएटर ऑफ ॲब्सर्डिटी या दृष्टी कोनातून काय ते बोला' असा त्यांचा आग्रह दिसला. चित्र विचित्र घटना, आभास व सत्यता यातील घोळ, सामान्यपणे विशिष्ट दर्जाच्या व्यक्तीकडून ज्या वागणुकीची अपेक्षा नसते अशी वागणूक (उदा. प्रोफेसरचे सतत पाणी भरणे, भोंडला नाचणे इ.) ह्या ॲब्सर्डिटीचा अर्थ असेल तर नाटक नक्कीच 'शंभर टक्के' यशस्वी झाले. पण एकंदर मानवी प्रयत्नाची निष्फळता, बौद्धीकतेची निरर्थकता, सत्याचा अर्थ लावण्याचा मूर्खपणाचा प्रयत्न अशा दृष्टीकोनातून अर्थ लावायचा असेल तर संहिता व प्रयोग दोन्हीही सुंदर आहेत. पण विशिष्टपणे या गटाकडून जास्त शक्तीमान लेखन व प्रयोग यांची अपेक्षा होती. दुसऱ्या बारक्यासारख्या गटाने हेच नाटक केले असते तर मी सर्व कौतुकच केले असते. पण या मंडळींना वेगळे स्थान आहे. नाटकाकडे बघण्याचा यांचा दृष्टिकोन जास्त बौद्धिक व प्रगल्भ आहे. म्हणून हे विच्छेदन. मृत्यूच्या सतत जाणिवेने उत्कटतेने जगलेले क्षण— ते खरे अस्तित्त्व असे अस्तित्त्ववादात एक तत्त्व आहे. त्या दृष्टीने प्रत्येक क्षण जगण्याची नितांत आवश्यकता व त्यातून पदरी आलेले वैफल्य या स्तरावर प्रोफेसर कधी गेला नाही. आपल्या जगण्याच्या पद्धतीने प्रेक्षकांना स्वतःलाच प्रश्न

विचारायला लावण्यास, प्रेक्षकांच्या गृहीतास आव्हान देण्यास प्रोफेसर जरा कमीच पडला. आजूबाजूच्या काही प्रेक्षकांकडून, 'काही तरी विचित्रच दाखवतात झाले' अशी पुटपुट झालेली ही मी ऐकली. लेखन व अभिनयाचा हा थोडा पराभव झाला असे मला वाटले. आणि शेवटी उद्गार आले, 'विचारा प्रोफेसर,' दयनीयतेच्या रूढ अर्थाच्या इतक्या जवळ आळेकरांचे लेखन दिग्दर्शन व डॉ. मोहन आगाशांचा अभिनय गेला. सादरकर्त्या गटाला अभिप्रेत होती ती ॲब्सर्डिटी हीच का?

मनोविकारशास्त्राच्या दृष्टीने नाटकाचा अर्थ लावणे कठीण आहे. मला स्वतःला 'सायकिॲट्रीमधील नाट्यलेखनाचा एक्सरसाईज' म्हणून हे नाटक जास्त जवळचे वाटले. आणखीही एकदोन या शाखेचे तज्ज्ञ तिथे उपस्थित होते. कुणाला हे नाटक म्हणजे 'स्किझोफ्रेनिया' या रोगाचे रंगभूमीवरचे लक्षण, दर्शन वाटले, कुणाला 'इन्व्होल्लूशनल सायकोसिस' या रोगाचे वाटले. कुणी एवढेच म्हटले की 'लॉस ऑफ कॉंटॅक्ट विथ रिॲलिटी आणि रिग्रेशन' याचे हे उत्तम चित्रण आहे. शेवटच्या दृष्टीकोनातून पाहिले तर मात्र नाटक अगदी सरस उतरले आहे यात काहीच शंका नाही. पण हा दृष्टिकोन मला ऐसपैस आहे. आणि ऐसपैसपणाचा फायदा उठवणे हे काही फारसे बरे नाही. या दृष्टिकोनातून जरी पाहिले तरी तेंडुलकरांचे 'भल्याकाका' जास्त सरस होते. त्या नाटकाला एक लिरिकल क्वॉलिटी होती. ती 'मिकी आणि मेमसाहेब'ला नाही.'भल्याकाका' हे तेंडुलकरांचे गौण नाटक पण क्लिनिकल एक्सरसाईज या दृष्टीने ते नाटक श्रेष्ठ होते. व त्याची आवर्तनशील लयबद्धता तर मी कधीही विसरणार नाही. 'मिकी आणि मेमसाहेब'ला ती काव्यात्मकता लाभली नाही. मनोविकारशास्त्रावर जबरदस्त पकड असलेला दुसरा लेखक म्हणजे बादल सरकार. त्यांचे 'बाकी इतिहास' असेच अविस्मरणीय आहे. आत्महत्येचे विकृत मानसशास्त्र इतक्या सुंदर रीतीने मराठी रंगभूमीवर आलेले मी इतरत्र पाहिलेले नाही. पण तरी त्या नाटकाचे मूळ बंगाली आहे. मराठी नाटकात लेखनाच्या दृष्टीने व नवीन लेखकात (तेंडुलकर आता पलिकडच्या पिढीत गेले) सतीश आळेकरांकडून अपेक्षा उंचावत आहेत. मनोविकार शास्त्राचे नवे पैलू सादर करायला मराठीत अजून खूप वाव आहे.

सतीश आळेकर जर त्या मार्गाने गाडी हाकतील तर खूप नवे नवे प्रांत ते स्वतः पाहू शकतील व प्रेक्षकांना दाखवू शकतील. आळेकरांची नाटके मनोविकारी व्यक्तिमत्त्वाशी नाते राखून असतात. खरे तर त्याच अंगाने ती फुलतात. म्हणून या मुद्याच्या सविस्तरपणाचे सव्यापसव्य.

'मिकी' म्हटले की 'मिकी माऊस' आणि वॉल्ट डिस्ने यांची आठवण ओघाने आलीच. स्वतः नाटकातही ती काढलेली आहे. वर संबंधिताकडून

असेही मी ऐकले होते की या नाटकात फँटसी व रिॲलिटीचे सुंदर मिश्रण आहे. त्या संदर्भात वॉल्ट डिस्नेच्या 'मेरी पॉपिन्स' या सिनेमाची राहून राहून आठवण येते. 'मेरी पॉपिन्स'-मध्ये आभास व सत्य यांच्या सीमारेषा इतक्या हळुवार रंगात भरल्या आहेत की ज्याचे नाव ते. सत्य परिस्थितीच्या चटक्यातून स्वप्नरंजन कधी सुरू होते ते कळतही नाही. एकंदर विषय हाताळण्यात हा हळुवारपणा 'मिकी आणि मेमसाहेब'ला लाभलेला नाही. अर्थात तसा हळूवारपणा लेखकला अभिप्रेत असावाच अशी अपेक्षा नाही. पण त्या एका गुणाने नाटकाचा वाङ्मयगुण खूप उंचावला असता एवढे खरे.

आक्रमण व हिंसा या संदर्भातही नाटकाबद्दल बोलता येईल. प्रोफेसरच्या पत्नीचे आक्रमण उघड उघड लिबिडिबल आहे. प्रोफेसरने ते आपल्या विषयाच्या अभ्यासात बुडवून टाकले आहे. पत्नीच्या हिंसाचाराचे स्वरूप क्रूर व उघड आहे. फ्रॉईडने 'कॅस्ट्रेशन अँक्झायटी' असा एक वाक्प्रचार वापरला होता. स्त्रीची काही शारिरीक वैशिष्टये अशी आहेत की त्यामुळे ती पुरुषासारखी वागू शकत नाही. या कमीपणाच्या भावनेचे क्रूर वागणुकीत रूपांतर झालेले या पात्रात दिसते. तर प्रोफेसरची उलटी तऱ्हा आहे. स्वतःचे आक्रमण व हिंसा या त्याने विद्याभ्यासात तर बुडवलेल्या आहेतच. पण त्याबरोबरच पत्नीच्या आक्रमक स्वभावाच्या अगदी उलट टोकाला तो गेला आहे. तो म्हणजे 'सबमिशन'चे मूर्तिमंत स्वरूप आहे. हे सब्लिमेशन व सबमिशन या द्वारे आपले आक्रमण व हिंसा तो दाबू पहातो व हे मार्ग जेव्हा मोडून पडतात तेव्हा त्याचे सर्व व्यक्तिमत्त्व कोसळून पडते. या दृष्टीकोनातून नाटक यशस्वी झाले आहे हे नमूद केले पाहिजे.

एवढी सर्व चर्चा साधारण लेखनाबद्दल झाली. आता जरा प्रयोगाबद्दल.

डॉ. मोहन आगाशे यांनी सर्वसाधारणपणे उत्तम अभिनय केला. पण त्यांच्याकडून जास्त अपेक्षा होती. त्याचा अभिनय शब्दांच्या पलिकडे फारसा गेला नाही. ओळीच्यामधले अर्थ व्यक्त करायला खरे म्हणजे या भूमिकेत कल्पनेच्या बाहेर वाव होता. मनोव्यापारांचा विशेष अभ्यास डॉ. आगाशे करीत आहेत. त्या दृष्टीने पाहिले तर ही भूमिका म्हणजे एक आव्हानच होते. ते आव्हान त्यांनी पेलून घेतलेसुद्धा पण आवेशाने नाही. धनुष्य उचलता उचलता रामाने मध्येच दम घेतला तर कसे वाटेल ! तसे काहीसे झाले आणि मोहन आगाशेसारख्या अनुभवी नटाने मधूनच बेअरिंग सोडावे ?

जुईली देऊसकरांनी पत्नीची भूमिका केली. छान केली, पण जरा भडक रंगात झाली. तरुण सुंदर स्त्रीचा फिगर कॉन्शसनेस आणि वासनांची अतृप्ती त्यांनी यथायोग्य दाखवली. पण प्रोफेसरची पत्नी प्रोफेसरला सुखासाठी सेडयूस करते असे एक दृश्य आहे. तिथे दिग्दर्शक आणि नटनटी या सर्वांनीच जरा खालची पट्टी लावली असती तर

छान झाले असते. हे दृश्य आधीच टोन डाऊन केलेले आहे हे मान्य केले पाहिजे पण अजूनही फिके रंग चालतील. शेवटी एक लक्षात घेतले पाहिजे की तो नवरा बायकोचा व्यक्तिगत प्रसंग आहे. त्यात प्रेक्षक चाळवले जाऊ नयेत असेही एक वाक्य आहे की, 'सालीचा हात म्हणजे मोरपीस आहे.' ही मोरपिसांची नजाकत कुठे दिसली नाही.

गुळवणीचे काम श्री. मोहन गोखले यांनी केले. सतत योग्य ते बेअरिंग त्यांनी राखले. भित्रा, चाचपडत वागणारा, अपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा तरुण त्यांनी छान उभा केला. पण पायाने लंगडण्याची गरज होती का? लंगडा-यचेच असेल तर हे लंगडेपण कोणत्या रोगाने आले असेल त्याचा विचार होऊन त्या रोगाची सहीसही नक्कल व्हायला पाहिजे.

ध्वनियोजना श्री. साठे यांची होती. संगीत साठे यांचे होते की आळेकरांचे हे माहीत नाही पण अभारतीय संगीताचे सुंदर तुकडे वापरले होते यात शंका नाही. भैरवीचा वापर कन्व्हेन्शनल वाटला.

प्रकाश योजना आणि नेपथ्य यथा-योग्य होते.

सूत्रधार डॉ. जब्बार पटेल व श्री. श्रीधर राजगुरू होते. पण जब्बार पटेल यांचे पॉलिश प्रयोगाला नव्हते.

सतीश आळेकरांचे लेखनाबाबत चर्चा केलेलीच आहे. दिग्दर्शनाबाबत त्यांनी अपेक्षा उंचावलेल्या आहेत हे नक्की.

जाता जाता मागच्या वर्षीच्या 'घाशीराम कोतवाल'ची आठवण झाली. याच गटाने ते केले. 'घाशीराम' व 'मिकी'ची जातकुळी एकदम वेगळी आहे. हे मान्य करूनसुद्धा असे वाटले की, 'घाशीराम' हा एक अपूर्व नाट्या-नुभव होता. 'मिकी'ला ती थोरवी मिळविता येणार नाही. प्रॉडक्शन व्हॅल्यूजही 'घाशीराम'च्या अप्रतिम होत्या. पण शेवटी 'मिकी'चे वय फक्त एक वर्षाचे आहे. त्या मानाने त्याने मारलेली मजल कौतुकास्पद आहे थिएटर अ‍ॅकॅडेमीने गाठलेला पल्ला अभिमानास्पद आहे व त्याबाबत त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

शेवटी, या चर्चेची पट्टी जरा वरची लागली हे खरे पण थिएटर अ‍ॅकॅडमी-कडून अपेक्षाही तेवढ्या उंच आहेत म्हणून हा पसारा. एरवी काय, इतरां-कडून आनंदच असतो.

□ □ □

# मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि मी. श्री. प्रभाकर वैद्य यांना आव्हान

अ. भि. शहा

---

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या युगांतर या मुखपत्रांच्या दि. दि. २६ नोव्हेंबर १९७३ च्या महात्मा ज्योतिराव फुले विशेषांकात श्री. वैद्य यांचा 'मुस्लिम सत्यशोधक चळवळ : तीन वर्षांच्या कार्याचा जमाखर्च, हा लेख वाचून बरीच करमणूक झाली. उतार वयात झालेल्या एका राजकीय पक्षाच्या एका वयोवृद्ध सदस्याने इतक्या बेजबाबदार वृत्तीने लिहावे याबद्दल थोडे, पण मात्र थोडेच वाईटही वाटले. श्री. वैद्य यांच्या लेखात प्रतिबिंबित झालेले विचार व मानस जर मास्कोप्रणीत भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रतिनिधिक असले तर भारतीय प्रबोधनाच्या दृष्टीने ती चिंतेची बाब समजली पाहिजे. कारण मार्क्सवादाशी माझे काही मूलगामी भेद-मतभेद असले तरी युरोपीय प्रबोधनाचे एक विकसित स्वरूप म्हणून त्या तत्त्वज्ञानाबद्दल मला नेहमी आदर आणि आपुलकी वाटत आली आहे. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा स्वतःस अधिकृत वारस म्हणवून घेणाऱ्या पक्षाच्या नियतकालिकात त्या पक्षाच्या एका ज्येष्ठ सदस्याने वर उल्लेख केलेला लेख, आणि तेही ज्योतिराव फुले यांच्या मंगल नावाची सबब पुढे करून काढलेल्या विशेषांकात लिहावा म्हणून करमणूक आणि खेद.

वैद्य महाशय म्हणतात की मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा मी मुख्य प्रवर्तक आहे. आणि या चळवळीला जी साधनसामुग्री खर्ची पडली, साखळी वृत्तपत्रांचा जो भरघोस पाठिंबा सतत लाभला, संघ-जनसंघवाल्यांची जी जल्लोष गर्दी जमली या सगळ्या मिळणीजुळणीला कदाचित शहा महाशयांचे वजन, प्रतिष्ठा, योग्य ठिकाणचे योग्य संबंध उपयोगी पडले असण्याचा दाट संभव आहे! तसेच, त्यांच्या

पृष्ठ ४२ वर

# आता महाराष्ट्र बंद

माणूस प्रतिनिधी

२ जानेवारी १९७४ ला ' महाराष्ट्र बंद 'ची घोषणा कामगार संघटनांनी केली आहे आणि आज मुंबईत तरी कामगार संघटना, त्यांचे प्रतिनिधी ह्यांची त्याच दिशेने धडपड चालू आहे. सर्वच डाव्या संघटनांचे संघटित प्रयत्न सुरू आहेत. ठिकठिकाणच्या ' गेट मिटिंग्ज 'मधून ह्या ' बंद 'चा धूमधडाका प्रचार सुरू आहे. जॉर्जसाहेबांचा रेल्वे कर्मचारी देखील ह्यावेळी ' बंद 'मध्ये उतरणार आहे व मुंबई-महाराष्ट्रातली रेल्वे वहातूक बंद करण्याचा प्रयत्न करणार आहे. एस. टी., बेस्ट, गिरण-गाव, शेतमजूर...सर्वच आघाडयांवर आज तरी वातावरण तयार होत असल्याचे निश्चित जाणवत आहे. भारतीय मझदूर संघ तसेच स्वतंत्र कामगार संघटना ह्या ' बंद 'मध्ये सामील होणार आहेत. ' इंटक ' अर्था-तच बाहेर राहणार आहे. शिवसेनेच्या ' कामगार सेने 'चा निर्णय अद्याप तरी समजलेला नाही. मागच्या मंगळवारी ' शिवसेना ' पुरस्कृत ' मुंबई-बंद 'ला अभूतपूर्व यश मिळाले. ' बंद 'च्या आदल्याच दिवशी कॉंग्रेससह सर्वच पक्षांनी १८ तारखेच्या ' बंद 'ला पाठिंबा देऊन ' बंद 'चे यश जवळजवळ निश्चित केले होते. तरी देखील ' बंद ' शिव-सेनेचा होता आणि त्यामुळेच पुन्हा लगेच १५ दिवसांनी जनतेला दुसऱ्या ' बंद 'चे आवाहन शिवसेना करील का हा प्रश्न आहे.

शिवसेनेचा बंद महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद लवकर निकालात निघावा म्हणून होता. संकल्पित, २ जानेवारी ७४ चा ' महाराष्ट्र बंद ' त्याहीपेक्षा अधिक जिव्हाळयाच्या प्रश्नावर आहे. बेसुमार भाववाढ, औद्योगिक अशांतता, कामगारांना सोसावे लागणारे हाल ह्या सध्या जीणे असह्य करून सोडणाऱ्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी २ जाने-वारीचा ' बंद ' आहे. अर्थात तरीदेखील शिवसेनेच्या बंदला जो सर्वपक्षीय (कॉंग्रेससह) पाठिंबा मिळाला. तसा

तो 'महाराष्ट्र बंद 'ला मिळणार नाही हेही तितकेच खरे. केंद्राने त्वरित पावले उचलावीत म्हणून केंद्रावर दडपण आणण्यासाठी केलेल्या 'बंद 'ला खुद्द राज्य शासनाचीही सहानुभूती होती. सत्ताधारी पक्ष उघडपणे बंदला पाठिंबा व्यक्तवीत होता. 'महाराष्ट्र बंद' (२ जानेवारी ७४) ची परिस्थिती अर्थातच वेगळी राहणार आहे. हा 'बंद 'मुख्यत्त्वेकरून राज्य शासनाविरुद्धच आहे. गेल्या वर्षभरात भाववाढ रोखण्यात, लोकांच्या किमान गरजा भागविण्यात शासनाला आलेले अपयश हा या बंदचा मुख्य रोख आहे. शासन, इंटक, कॉंग्रेस पक्ष म्हणूनच या बंदमध्य सहभागी होणार नाहीत. 'मुंबई बंद' एवढे भरीव यश, त्यामुळेच जनतेच्या अधिक जिव्हाळ्याच्या प्रश्नांसाठी असूनही 'महाराष्ट्र बंद' ला मिळेल का, ह्याविषयी मी स्वतः साशंक आहे.

कामगार सेनेची आजपर्यंतची वाटचाल पाहता आणि श्री. रजनी पटेलांनी मुंबईतली लोकसभेची निवडणूक डोळ्यापुढे ठेवून शिवसेनेच्या 'मुंबई बंद 'ला दिलेला पाठिंबा लक्षात घेता, श्री. ठाकरे आपल्या सेनेला 'महाराष्ट्र बंद 'च्या खोड्यात अडकवतील असे वाटत नाही. तेव्हा प्रामुख्याने इंटक व कॉंग्रेस आणि कामगार-सेना व शिवसेना ह्यांच्या विरोधात डाव्या कामगार संघटनांना आपला संकल्पित बंद रेटून न्यावा लागणार आहे. तसा तो रेटताना चकमकी उडणारच नाहीत, बंद शांतपणेच पार पडेल अशी ग्वाही देता येणार नाही. परवाच्या 'मुंबई बंद'मध्ये खाजगी गाड्या, सायकली, इतर वाहने शिवसैनिक अडवीत होते. प्रवाशांना रेल्वेस्थानकात शिरायला मज्जाव करून त्यांना घरी पाठवीत होते. हे सारे प्रकार पोलीस बंदोबस्तात

---

## नागपूरचे टॉनिक

सचिवालयातली मंडळी नुकतीच नागपूर सेशन आटोपून परतली होती. अजून तिथून आलेली खोकीसुद्धा उघडली गेली नव्हती. एका सचिवांना भेटलो तेव्हा ते म्हणाले, '...एक महिना मोठा मजेत गेला बघा! भरपूर भूक लागते, खाल्लेले पचतेही भरपूर. महिन्यात पाच पौंड वजन वाढले बघा... आता पुनः मुंबईत परतलो. आता पुनः आहेच पोल्युटेड हवा, पोल्युटेड पाणी, पोल्युटेड खाणे...'

'आणि पोल्युटेड माणसेसुद्धा का?' ह्या प्रश्नातर मनमुराद हसून सचीव पुढे म्हणाले, '...पण काही म्हणा, ह्या महिनाभराच्या टॉनिकवर पुढले वर्ष सहज मला रेटून नेता येईल...'

विधानसभेचे एक अधिवेशन नागपूरला भरवले जाते, ते नागपूरकरांना चुचकारण्यासाठी अशी आपली कल्पना. पण त्यामुळे असा काही 'संजीवनी' प्रकार घडत असेल असे मात्र कधीही वाटले नव्हते.

सुरळीत पार पडत होते. जनतेच्या सीमा प्रश्नावरील प्रखर भावना म्हणे त्यामुळे 'दिसून' येत होत्या. रेशनच्या किंवा कुठल्याही रांगेतल्या, लोकलसच्या बेफाट गर्दीतल्या किंवा खेड्यात राबणाऱ्यांतल्या कुठल्याही सर्वसामान्य माणसाला तुम्ही सहजी वाचपलेत, तरसीमा प्रश्नाबाबत तो बराचसा उदासीन दिसेल. पण त्याच्या दैनंदिन जीवनाविषयी, भाववाढी विषयी तुम्ही विचारलेत तर त्याच्या मनात चाललेल्या भयानक तांडवाची तुम्हाला सहज कल्पना येईल. तेव्हा या तांडवाला वाचा फोडणाऱ्या 'बंद'ला काँग्रेस, इंटक सह सर्वांनी पाठिंबा द्यायला हवा. पण तसं होणार नाही. हे म्हणताना बेळगाव साठी झालेल्या 'बंद'चे कारण कमी लेखण्याचा माझा उद्देश नाही. मला एवढं मात्र जरूर म्हायचे आहे, की एकूणच सामान्य जनतेच्या प्रश्नांपेक्षा, शासनालाही रुचेल व ज्याचा राजकीय फायदा उठवता येईल अशा प्रश्नांवर लक्ष केंद्रीत होते. प्रसंगी सध्याच्या गंभीर आर्थिक, सामाजिक प्रश्नांवरून जनतेचे लक्ष दुसरीकडे वेधायचे पातक करूनही !

'मुंबई बंद' काय किंवा महाराष्ट्र बंद काय, ह्यावेळी प्रथमच रेल्वे कर्मचारी अशा 'बंद'मध्ये सहभागी होत आहे. 'महाराष्ट्र बंद'मध्ये ह्यावेळी प्रथमच शेतमजुरांना सहभागी व्हायचे आवाहन केले गेले आहे, तर बाबू लोकांची अलिकडेच स्थापन झालेली मध्यवर्ती संघटनाही ह्या 'बंद'मध्ये सामील होणार आहे. ह्या निमित्ताने अलिकडे आपापसात पटत नसलेल्या अनेक डाव्या संघटना एकत्रित येत आहेत. ह्याच बंदच्या समर्थनार्थ असलेल्या एका सभेत बोलताना, श्री. यशवंत चव्हाण ('मला यशवंतराव म्हणू नका, प्लीज, कारण त्यामुळे फार घोटाळा होतो हो ! दिल्लीत गेलेल्या त्या यशवंतरावांनी आणि तिथल्या शासनाने आमच्या कामगारांच्या तोंडाला पुसलेल्या पानांचे पातकही मग माझ्याच माथी येते !' श्री. यशवंत चव्हाण) ह्यांनी अशा एकत्रित येऊन लढण्यामुळे निर्माण होणाऱ्या ताकदीमुळेच शासनावर दडपण येईल असे जे सांगितले ते एका अर्थी खरेच आहे !

इथपर्यंत 'बंद'चे पुराण लावून झाल्यावर इथ थोडे विषयांतर करतो. ह्या 'बंद'मुळे काय साधते ? शासनाची अशा 'बंद', 'संप' 'घेराव' मोर्चे' प्रकारात खेळणे बनते सामान्य जनता, आणि 'पिटातून' टाळ्या पिटीत राहतात शासक, पुढारी, मालक वर्ग !!

● ● ●

# मानवत....
# बन्सीची सुटका !

निळू दामले

काय भानगड आहे काही क त नाही. मंत्र्याने, मोठ्या पोलीस अधिकाऱ्याने काही घोषणा केली रे केली; किंवा निष्णात म्हणवल्या जाणाऱ्या चौकशी अधिकाऱ्याने सूत्रे हातात घेतली रे घेतली की लगेच एखादा खून पाडायचाच असा चंगच मानवतच्या खुन्यांनी बांधलेला दिसतो.

डिसेंबरला पुण्यात असतानाच वृत्तपत्रांतून आलेली बातमी पाहिली.मुंबईचे नामांकित पोलीस अधिकारी श्री.वाकटकर व श्री. कुलकर्णी यांना या खुनांच्या तपासासाठी मानवतला पाठविण्यात आल्याचे ती बातमी ठळकपणे सांगत होती.माझ्या मनात पाल चुकचुकलीहोती.

## ८ वा खून

वाकटकर-कुलकर्णींनी तपासाची सूत्रे हातात घतली आणि ८ तारखेलाच त्यांना हबका मिळाला. आधीचे खून कसले शोधता, हा घ्या आणखी एक खन. असे म्हणून८वा बळी८ डिसेंबरलाच या दोघांच्या हाती सोपविण्यात आला.

८ डिसेंबरला हे प्रेत मिळाले. प्रेत होते कोंडीबा रूळे या नावाच्या १४ वर्षे वयाच्या मुलाचे.

ठिकाण होते कुप्रसिद्ध पां रीच्या मारुतीच्यापासून हाकेच्या अंतरावरच एक शेत.

प्रेताच्या चेहऱ्यावर कुऱ्हाडीने घाव घातल्याच्या खुणा होत्या. सर्व चेहरा आणि अंगावरचे कपडे रक्ताने माखलेले होते. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार खून होऊन दोन दिवस होऊन गेलेले होते. त्यामुळे प्रेताला दुर्गंधी येत होती. माशा घोंगावत होत्या. जथे प्रेत होते त्याच्या आसपासच्या खुणांवरून एक गोष्ट जाणवत होती की, इतर ठिकाणी मारून हे प्रेत फरफटत इथे आणून टाकण्यात आले होते.

आता आरोपी म्हणून समिदराबाई नावाच्या पारधी स्त्रीला अटक करण्यात आली. कोण ही समिदराबाई ? उत्तमराव बारहाते व त्याची रखेली यांना अटक झाल्याचे वाचकांच्या स्मरणात असेलच, त्या रखेलीची ही बहीण आहे. हिनेच खून केला असावा असे पोलिसांचे म्हणणे आहे. का केला खून ?

हा कोंडीबा समिदराबाईच्या शेळ्या राखण्याचे काम करीत होता. त्याच्या हातून एक शेळी हरवली होती. ही शेळी जर परत आणून दिली नाहीस तर तुला मारून टाकीन असे ती म्हणाली होती.

इतक्या साध्या कारणावरून लहान मुलाचा निर्घृण खून होऊ शकतो ? एक थप्पड मारली आणि मुलगा मेला किंवा पिस्तुलाच्या गोळीने एका फटक्यात मुलगा मेला असा प्रकार झाला असता तर भावनेच्या भरात ते घडून गेले असे म्हणता आले असते. पण प्रत्यक्षात मुलाच्या चेहऱ्यावर कुऱ्हाडीच्या घावाच्या खुणा आहेत. म्हणजे झटकन घडून आलेले कृत्य असा शिक्का मारणे कठीण आहे. मग प्रकार तरी काय आहे ?

पोलीस नेहमीच्या ठामपणे वागताहेत. हा खून त्या कुप्रसिद्ध खून मालिके-

तला नाहीच असे पोलिसांनी तडकाफडकी जाहीर करून टाकले आहे. इतक्या झटकन निर्णय जाहीर होण्यात लोकांचे मनोधैर्य वाढविणे हा उद्देश असेल तर भाग वेगळा. पण समिंदराबाईच्या अटकेनंतर काही महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागतील असे पोलिसांना वाटते आहे, तशी त्यांची धडपडही चालूच आहे.

हा खून प्रत्यक्षात मालिकेतला नसला तरी ोलिसांना चकवण्यासाठी, त्यांच्या तपासाच्या दिशेला वेगळे वळण लागावे यासाठी केला असण्याचीही दाट शक्यता आहे. कोणत्याही आरोपींना पकडले गेल्यावर तातडीने खून पडल्याची वेळ २-३ वेळा आली असल्याने हा संशय आणखी दाट होत आहे. पोलिसांना आव्हान देण्यासारखाच प्रकार आहे.

१० तारखेला पुन्हा एकदा धमाल उडून गेली, आरीफा बी न.वाच्या एका लहान मुलीचा खून झाल्याचे आढळून आले. कारणे अजून अज्ञात आहेत. पोलिसांचे म्हणणे असे को हा खून नाही, अपघात आहे. उपलब्ध असलेल्या पुराव्यानुसार हा अपघात आहे की खून आहे हे निर्णायकरीत्या अजूनही ठरवता येणे कठीण आहे

पण अज्ञात कारणामुळे ज्याला रहस्यमय असे म्हणता येईल असा हा मृत्यू आहे हे मात्र कबूल करावेच लागेल. ६ दिवसाच्या अंतराने झालेले हे दोन मृत्यू आहेत.

या आराफाबीच्या मृत्यूनंतर पुन्हा एक माणूस गायब झाल्याची ताजी वार्ता मानवतात पसरली आहे.

मृत्यू वाढतच आहेत, आता कोणी तरी गायब होणे, नंतर त्याचे प्रेत सापडणे, नंतर खून किंवा आत्महत्या किंवा अपघात अशी त्या प्रेताची विल्हेवाट लावणे ही गोष्ट मानवतकरांना सवयीची बाब होऊन गेली आहे.

पोलीस जास्तच भांबावून जात आहेत त्यांचे दारू पिऊन धिंगाणा करणेही वाढतेच आहे. आता रेशनवर धान्य न मिळणे, उन्हाळयात पाण्याची टंचाई भासणे, मराठवाडा मागासलेला असणे या नित्य सवयीच्या विधानाप्रमाणेच मानवतला आणखी एक खून किंवा रहस्यमय मृत्यू झाला असे विधान अगदी नित्य सवयीचेच झाले आहे.

मजा आहे,

पोलीस स्टेशनमध्ये एक चक्कर टाकली.

बातमी कळली.

बन्सी वाळकेला आता व्यक्तिगत जामिनावर सोडण्याची शिफारस पोलिसांनी केली आहे, कारण असे की त्याच्याविरूद्ध पुरावा मिळालेला नाही, म्हणजे आता बन्सी वाळके मोकळा होणार तर,

२ महिन्यापूर्वी ॲडिशनल आय. जी. पी. श्री मोडक म्हणाले होते की वाळके हाच मुख्य आरोपी आहे. मोठ्या गर्वाने ते पाथरीच्या डाक बंगल्याच्या आवारात सांगत होते की रामन राघवन प्रमाणेच आम्ही बन्सी वाळकेला केवळ पकडले आहे. एवढेच नव्हे तर त्याच्यावरचा आरोपही आम्ही सिद्ध करणार आहोत. पुरावे काय आहेत हे विचारल्यावर ते तुम्ही कोर्टातच पहाल अशा दिमाखात मोडक बोलत होते. आता बन्सी वाळकेला पुराव्या अभावी सोडून दिले जात आहे.

मानवत प्रकरण लवकर संपणार नाही असाच याचा अर्थ आहे. □

# मुक्ताफळे

## □ पुढे पुढे होते फजिती !

दिल्लीला एक योजना-भवन आहे. 'गरिबी-हटाव'च्या योजना तेथे तयार होतात. त्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून आज्ञाधारक अर्थशास्त्रज्ञ तिथे बोलावले जातात. अर्थशास्त्रज्ञ हा त्याच्या विषयांतला तज्ज्ञ समजला जातो. या तज्ज्ञ मंडळींचा मोठ्ठा दोष म्हणजे ते स्वतःला तज्ज्ञ समजतातच, पण इतरांना अज्ञ समजतात. त्यांच्या हे लक्षात येत नाही की ही माजोरी लोकशाहीत चालणार नाही ! शेवटी बहुमत अज्ञांचे असणार आहे आणि तज्ज्ञांनी त्यांच्याशी जमवून घेण्यातच त्यांचे हित आहे. अशाच एका ज्ञानाने तज्ज्ञ परंतु व्यवहारात अज्ञ असलेल्या अर्थशास्त्रज्ञाची परवा योजना-भवनातून हकालपट्टी झाली.

या तज्ज्ञाचे नाव – डॉ. मिनहास. पाचव्या पंचवार्षिक योजनेचा हा पहिला बळी ठरला आहे. 'बळी तो कान पिळी' येथपर्यंत बळी संबंधी दिलेली माहिती अर्धवट आहे. एकदा कान पिळल्यानंतर हा बळी वेदीवर चढवला जातो त्याचे काय ? या डॉ. मिनहासने सर्वांचेच कान पिळायला सुरुवात केली. गेल्या अठरा महिन्यांत या माणसाने पाच-सहा वेळा राजिनामा देण्याची धमकी दिली ! अरे धमकी कुणाला ? योजना-भवनाचे उपाध्यक्ष डी. पी. धार यांना ? योजनाभवनात धार आहे ती फक्त उपाध्यक्षांच्या तलवारीला. डी. पी. धार हे इंदिराजींचे तूर्त लाडके आहेत. पूर्वी हकसार लाडके होते, दिनेशसिंग होते. हल्ली धार आहेत. योजना-भवनात आजकाल जो धारेला लागला तो सरळ काठाला पोचतो. विरुद्ध गेला की गटांगळ्या खायला लागलाच.

डॉ. मिनहास वाट्टेल ते बोलायचा. सरकारने गव्हाचा व्यापार ताब्यात घेतला. याचे तोंड वाकडे. म्हणाला – 'हे करू नका. ही मसलत सरकारला पेलणारी नाही…' एक केंद्रीयमंत्री त्याला शेवटी म्हणाला – 'तुम्ही काय मला मूर्ख समजता ?' डॉ. मिनहासने मंत्री रागावला आहे हे लक्षात घेऊन, गप्प बसायचे की नाही ? पण हा अर्थशास्त्रज्ञ उलट काय म्हणाला नाहीत आहे ? ताडकन म्हणाला– 'समजायचा काय प्रश्न आहे ? तुम्ही इथल्या अनेक मुर्खांत एक आहातच मुळी…'

असा हा उद्धट माणूस.

सरकारने कोणती विमाने खरेदी करावी या संबंधीचा एक अहवाल याने तयार केला. निरनिराळ्या

जातीच्या विमानांच्या संबंधी जरा किचकट माहिती या अहवालांत होती. मंत्रीगणांवरोबर इंदिराजी जेव्हा या अहवालावर विचार करायला बसल्या तेव्हा अनेक मंत्री, डॉ. मिनहास यांना निरनिराळे प्रश्न विचारू लागले. प्रश्न विचारणारे अनेकवेळा विमानात बसलेले होते. यामुळे अहवालावर चर्चा करण्याचा त्यांचा अधिकार मोठा होता! तरीपण प्रश्न असे होते की एकतर त्यांची उत्तरे अहवालातच होती किंवा त्या प्रश्नांचा अहवालाशी काही संबंध नव्हता. यामुळे डॉ. मिनहास यांनी पंतप्रधानांना सांगितले –

'मदाम, आपल्या बहुतेक सहकाऱ्यांनी माझा अहवाल मुळी वाचलेलाच नाही. जर तुम्हाला भरपूर वेळ असेल तरच या मंडळींच्या डोक्यात प्रकाश पाडण्याचे कार्य मी सुरू करतो–

एक वेळेला तज्ज्ञ झाला तरी त्याने किती माणसांना दुखवावे! शेवटी गेल्या आठवड्यात डॉ. मिनहास यांच्या उद्धटपणाचा घडा भरला. पाचवी योजना, भवनात तयार होईल, ही योजना आपली सर्व उद्दिष्टे पुरी करू शकेल हे सिद्ध करण्याकरता धारकरांनी बऱ्याच गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत. ७२–७३ च्या किंमतीवर या योजनेकरता किती कोटीरुपये उपलब्ध होणार हे सांगितलेले आहे. डॉ. मिनहास यांचे म्हणणे –' ही सर्व धूळफेक आहे. या किंमती आता अस्तित्त्वातच नाहीत.' त्याचप्रमाणे राष्ट्रीयीकरण केलेल्या धंद्यातून योजनाकाळात जे उत्पादन गृहीत धरतो आहे ते सर्व आकड 'फुगवलेले आणि आचरट आशावादी' आहेत, असाही डॉ. मिनहास यांचा पक्का ग्रह आहे. अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाणांशी डॉ. मिनहास यांनी या गंभीर तक्रारी केल्या तेव्हा ते हसत म्हणाले –

'उद्दिष्टे ही पुरी झालीच पाहिजेत असा आग्रह का? आतापर्यंत कुठल्या योजनांची उद्दिष्टे पुरी झाली? न फसलेली एक तरी सरकारी योजना तुम्ही पाहिली आहे काय?'

अर्थमंत्री चव्हाण देखील हसत आहेत हे पाहून डॉ. मिनहास चक्रावला. त्याने इंदिराजींना पत्र लिहिले... 'योजना ओ. के. करण्यापूर्वी माझे पत्र विचारात घ्या!' पण तितक्यात मुळी ब्रेझनेव्हच आले. इंदिराजींना पत्राचा विचार करायला वेळ नको व्हायला? डॉ. मिनहास रागावला–संतापला–राजिनामा दिलान् आणि योजना भवनातून निघून गेला.

ब्रेझनेव्ह आले. त्यांनी भारताची पंचवार्षिक योजना, क्रेमलीनच्या अर्थव्यवस्थशी जोडून घेतली. आणि डॉ. मिनहास योजना-भवनाबाहेर फेकले गेले. डॉ. मिनहास यांना आता हे कळेल की मूठभर तज्ज्ञांनी बहुसंख्य अज्ञांशी भांडण्याचे हे दिवस नाहीत!

अज्ञांसी तज्ज्ञ उपदेशिती।
पुढे पुढ होते फजिती।।
ओळखीच्या लोकात महती।
मांडूची नये ।।१।।

## □ सुंदरा मनामध्ये भरली– कचेरीत शिरली

समजा, 'सुंदरा मनामध्ये भरली,' तर पुरुष तिच्याशी लग्न करायला तयार होतात का? प्रश्न सोपा वाटला तरी गहन आहे. दिल्ली विश्वविद्यालयात या प्रश्नावर संशोधन करण्यात आले. १९ ते ३० वयाच्या दोनशे पुरुषांवर हा प्रयोग करण्यात आला. 'ए कंपॅरेटिव्ह स्टडी, बिट्विन मॅरीड अ‍ॅन्ड अन्मॅरीड मेलस् रिगार्डिंग चॉईस ऑफ देअर लाईफ पार्टनर्स...' असे या संशोधनातून निर्माण झालेल्या प्रबंधाचे अगडबंब नाव वाचून, हा प्रबंध किती महत्त्वाचा आहे हे आपल्या लक्षात येईल.थोडक्यात सांगायचे तर 'तुम्हाला बायको कशी हवी?' किंवा 'बायको करताना तुम्ही काय पाहिले?' हा प्रश्न दोनशे तरुणांना विचारला. तेव्हा बहुतेकांनी 'बायको हुषार हवी, स्मार्ट हवी...' असे सांगितले. 'बायको सुंदर हवी' असा आग्रह कुणीच धरला नाही.

याचे कारण काय बरे असावे? सुंदर दिसण्याकरता तरुण मुली देहावर आणि वस्त्रांवर काय काय प्रयोग करीत असतात? असे असूनही तरुणांचे सौंदर्याबाबत इतके अनासक्त धोरण का? याचे कारण असे दिसते, की देशाची आर्थिक स्थिती सुधारल्याखेरीज सौंदर्याचे अधिष्ठान प्रस्थापित होणं कठीण आहे. लग्न करून बायको सांभाळणे तूर्त बहुसंख्याकांना शक्य नाही. दोघांनी नोकरी करून एकमेकांना सांभाळले, तरच जेमतेम महिना निभावतो, अशी परिस्थिती आहे. तेव्हा समजा, नुसती सुंदर बायको केली–तर सुंदर ते ध्यान। उभे माडीवरी। कर कटीवरी। ठेवूनिया॥ असे व्हायचे. पण तीच जर बायको हुषार असली तर नोकरी-चाकरी करील आणि एकदा घर नीट रेशनकार्डावर बसले, की सौंदर्य काय रस्तोरस्ती पहाता येईल! सर्व लग्नेच्छुकांचे हे धोरण स्पष्ट होत चालले आहे. तेव्हा 'सुंदरा मनामध्ये भरली' तरी हरकत नाही. पण जर ती पुढे 'हवेलीत शिरली' तर ती तरुणांचा अंतिम कबजा करणे कठीणच आहे. सुंदरींनी हवेलीत बंदिस्त होण्याचे दिवस संपलेले आहेत.

सुंदरा मनामध्ये भरली
कॅंडिडेट ठरली। कचेरीत शिरली।
नोटांची मांग॥ अशी स्थिती आहे. यापुढे सौंदर्याचा निभाव लागलाच तर कसा लागणार आहे हे सुंदर युवतींनी ओळखले पाहिजे. हवेलीत न शिरता, त्या एखाद्या कचेरीत शिरल्या म्हणजे मग–

सखी समज धर काही।
मजवाचुनि ग संसारी।
कुणाची भर करशिल सारी?

असे म्हणत रसिक तरुणांचा तांडा त्यांच्याही मागे लागल्याशिवाय रहाणार नाही.

• • •

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## बसभाडे वाढले तेव्हा

डिसेंबर महिना उगवला तो भानगडींचे बोचकं काखोटीला मारूनच. इथे कधी भानगडी नसतात म्हणा ! नेहमीचेच आहे हे. एखादा महिना शांततेत गेला तर कसे चुकल्याचुकल्यासारखे वाटते — अळणी जेवण जेवावे तसे. लोकांना राजकारणात भयंकर रस. त्यामुळे पक्ष, उपपक्ष यांचा सुळसुळाट. राजकर्त्यांचे चुकते केव्हा आणि आपण त्यावर हल्ला करतो केव्हा यासाठी विरोधी पक्ष टपून बसलेले असतात सदान्कदा.

नोव्हेंबरच्या मावळतीला दवंडी झाली — डिसेंबरपासून बसभाडे प्रत्येकी पाच पैशांनी वाढणार म्हणून...तोच प्रतिक्रीया सुरू. भाडे वाढेल तेव्हा वाढो, प्रतिक्रिया अगोदरच उमटायला लागल्या. इथल्या असंख्य संघटना कार्यक्षम असल्याचे कळणार कसे त्याखेरीज ?

मग सगळ्या विद्यार्थी 'संघटना अस्तन्या सारून पुढे सरसावल्या. चौकाचौकात निदर्शने होऊ लागली. चारी दिशांची वाहने आल्या वाटेने परत फिरू लागली कारण भर चौकात ही गर्दी !

ह्या भाऊगर्दीतही ट्रामगाड्या वळणावळणावर लचकत मुकाट्याने नाकासमोर चालू लागत. विरोध होता फक्त बसेस चालण्याला. कारण बसभाडी वाढली होती. डिसेंबर उजाडता उजाडता ह्या चळवळींना अधिक ऊत आला. 'बेशी भाडा देबेन ना, देबेन ना' हे नारे दिवसभर कानावर येत होते. ऑफिसवाले, कॉलेजवाले नि शाळकरी मुलंमुली यांचेवर देखील चारपाच मैलाचा रस्ता पायी तुडवण्याचा प्रसंग आला. राजा नसलेल्या देशात अंदाधुंदी माजावी तसेच काहीसे स्वरूप साऱ्या नगरीला प्राप्त झाले होते. आमचे मुख्यमंत्री कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. इतरांना ह्या अंदाधुंदीला आवर घालणे कठिण झाले. निरोप गेला तसे मुख्यमंत्री अर्ध्या रात्री धावतपळत घरी परतले. आल्याआल्या सगळ्या मंत्र्यांची सभा बोलावली आणि मध्यरात्री दीड वाजता गर्जना केली — 'बसभाडी वाढणारच, त्यात बदल होणार नाही. पण जो कोणी नागरिकत्त्वाच्या नियमांचे उल्लंघन करील त्याला अटक करण्यात येईल.'

परिणामतः दुसऱ्या दिवशी जरा दहशतीचे वातावरण दिसले. बसेस निमूटपणे जा—ये करू लागल्या. तरीपण निदर्शने थांबली नाहीतच. आणि निदर्शने होती म्हणून सगळ्या बसेस रस्त्यावर आल्याच नाहीत. फार थोड्यांनी तो धोका पत्करला. मग

विचारांची दिशा बदलली. मुख्यमंत्र्यांकडे विविध संघटनांचे प्रतिनिधी बोलणी करायला जाऊ लागले.

कुणाच्या तरी डोक्यातून नव्या कल्पनांचे अंकुर फुटले. ते म्हणाले – विद्यार्थ्यांना निदान सवलत द्यावी.

मुख्य मंत्री आपल्या विधानावर स्थिर राहिले. 'भाडी भाढणारच, त्यात बदल होणारी नाही.' मग प्रत्येक पक्षाचे लोक आपापली मते बोलून दाखवू लागले. ह्या विधानाला आमचा पूर्ण विरोध आहे. आम्ही निदर्शने करू. पण अत्यंत शांततेच्या मार्गाने. वाहने व्यवस्थित चालू देऊ. गडबड गोंधळ माजू देणार नाही.

मुख्य मंत्री गप्प राहिले. पण मनात म्हणाले असतील – 'करा लोकहो, हवी तेवढी निदर्शने. वाहने चालू द्या म्हणजे झालं. मग तुम्ही घसा फुटेपर्यंत ओरडलात तरी माझी हरकत नाही.'

सदैव आकाशपाताळ एक करून सोडणारे हे लोक शांततेच्या मार्गांचा अवलंब करू म्हणतात म्हणजे आपल्यासारख्यांना नवलच वाटते, नाही ?

थोडक्यात, सभा – निदर्शने सुरूच आहेत. अजूनही रस्त्यावर सर्व बसेस चालत नाहीत. लोकांचे हाल होताहेत. ह्यांचा पेशन्स किती टिकतो बघायचे ! ◻

## हंसाचा आदर्श ठेवा

बरं का गृहिणींनो ! तुम्ही आता हंसाचं अनुकरण करायला शिका... 'ही काय भानगड आहे आता ?,... पाहिलेत, मला पुरतं बोलूही देत नाही. लागलीच प्रश्न विचारू लागलात. मला म्हणायचंय तुम्ही आता हंसाचा आदर्श समोर ठेवून व्यवहारात वागायला हवे कसे ते सागते.

शाळेत मी जेव्हा नव्याने संस्कृत शिकत होते ना तेव्हा आमच्या सुभाषित रत्नमालेत एक श्लोक होता. तो आजही मला जसाच्या तस्सा आठवतोय. पुस्तकात इतर पुष्कळ श्लोक होते. सुभाषिते होती. काव्याचे अनेक प्रकार होते. ते मला काहीच आठवत नाहीत. पण मला आठवतो तो श्लोक असा हा–

हंसश्वेतो बकश्वेतः
को भेदो बकहंसयोः
नीरक्षीर विवेके तु
हंसो हंसो बको बकः

हा श्लोक शिकले तेव्हा मला प्रथम कळले की हंसाला दूध–पाणी वेगळे वेगळे करून दाखवण्याची जादू अवगत आहे म्हणून. आज तो श्लोक मला तीव्रतेने आठवण्याचे कारण म्हणजे आपल्याला प्रत्येक वस्तू भेसळीशिवाय शुद्ध स्वरूपात मिळत नाही हेच होय. आठवला तसा एक विचार मनात आला. हा भेसळ म्हणून जो प्रकार आहे तो फार पूर्वीपासूनच अस्तित्वात असला पाहिजे. ज्या काळात हा श्लोक रचला गेला त्या काळातही दूधपाणी मिसळूनच गवळी विकीत असावेत. एखाद्या हंसाने त्यातलं निर्भेळ दूध पिऊन टाकून पाणी फक्त शिल्लक ठेवण्याचा प्रयोग केला असावा. अन् ते

बघणाऱ्या कवीला वरील श्लोक स्फुरला असावा. काही का असेना, मला इतकेच म्हणायचेय की भेसळ पूर्वीही अस्तित्वात होती. आज तर ती एक फॅशन झाली आहे. तेव्हा हंसासारखे आपणही ह्या भेसळ वस्तूंवर प्रयोग शुद्ध वस्तू वेगळी काढून घ्यायला शिकले पाहिजे. नमुन्यादाखल हे दोन-तीन प्रयोग रुचतील तर करून पहा. हो, 'रुचतील तर' असे म्हटले कारण तुम्हाला ते रुचतीलच ह्याची मला खात्री नाही. प्रयोग सांगणारा हंस हा शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहणारा आहे तर गृहिणींचा दृष्टिकोन व्यावहारिक प्रात्यक्षिके करून बघण्याचा. ह्या दोन्हींचा मेळ कितपत जमेल ते सांगणं कठीण आहे. म्हणून म्हणते रुचले तर करून पहा. ते प्रयोग असे—

काळी मिरी बाजारातून आणल्यानंतर प्रथम एका भांड्यात पाणी घेऊन त्यात टाका. तळाशी बसतील तेवढीच काळी मिरी समजायची. वर तरंगतील त्या सगळ्या पपईच्या बिया म्हणून काढून फेकायच्या.

तिखटात लाकडाचा रंगवलेला भुसा मिसळलेला असतो. तो वेगळा करायसाठी देखील सारे तिखट पाण्यात ओतायचे. वर तरंगणारा लाकडाचा भुसा असतो. तिखट भांड्याच्या तळाशी जाऊन बसते (आता ह्या प्रयोगात तुमचे तिखट ओले होते हे त्या प्रयोग सांगणाऱ्या माणसाला कसे कळणार? त्याला थोडाच स्वयंपाक करायचा असतो?)


कापून तुकडे केलेली सुपारी बाजारातून आणाल तर ती देखील प्रथम पाण्यात टाका. कारण त्यात देखील मिसळ असते. लाकडाचे तुकडे मोठ्या कौशल्याने सुपारीच्या आकाराचे कापलेले असून बेमालूमपणे ते सुपारीत मिसळण्यात येतात. पाण्यात सुपारी टाकून वेगळी काढून घेण्याचा असा प्रयोग केलात तरच शुद्ध सुपारी तुम्हाला खायला मिळेल. त्यात जेवढे लाकडाचे तुकडे निघतील त्याचा खर्च फुकट जाणार त्याला इलाज नाही.


'शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन



सांगायलाच्
हवं का?
SATHE
MALTex
BISCUITS
SATHE
MALTex
BISCUITS
ताजी, कुरकुरीत व
रुचीला आगळीच-
वा! ही तर
साठे माल्टएक्स
बिस्किटेच!
ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता
माल्टमुळेच या बिस्किटात आहे.
पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्ये असलेली
माल्टएक्स बिस्किटे कितीही खा पुन्हा पुन्हा
खावीशी वाटतात ती या माल्टमुळेच!
साठे
बिस्किटें
आजच खरेदी करा अन् फरक पहा जरा!
heros'-SBC-49 C MAR

हिंगाचा खडा सुद्धा दोन बोटात धरून चोळून बघा. मग पाण्यात टाका. पाण्याला दुधिया पांढरा रंग आला तर तो हिंग समजावा. नाहीतर तो डिंकाचा खडा हळूहळू पाण्यात पूर्ण विरघळून जाईल.

असे अनेक प्रयोग करता येतील. त्यासाठी नीरक्षीर विवेकदृष्टी अंगी बाणायला हवी. ती ठेवणाऱ्या त्या हंसाला आणि भेसळ करणाऱ्या व्यापाऱ्यांनाही शतशः धन्यवाद. ¤

## गोष्ट सुनील आणि गौतमची

सुनील ग्रॅज्युएट झाला. त्याच्या सुदैवाने त्याचे शिक्षण सरळ रेषेत झाले. वेळचे वेळी परीक्षा व्हायच्या. हुशार असल्याकारणाने सुनील भरघोस यश घेऊन पास व्हायचा. ग्रॅज्युएशनच्या वळणावर आल्यावर अनेक रस्ते फुटलेले दिसले. ह्यातल्या कोणत्या मार्गाचा अवलंब करायचा हे ठरवायचे होते. तो अर्जाचे दगड टाकून पाहात होता. नेम बरोबर लागेल तो रस्ता आपला असे त्याने मनोमन ठरवले. ह्या अवधीत तीन महिने उलटले. कुणीतरी डिवचले—काय सुनील, अजून बेकारच का? त्याच्या मानी मनाला हे शब्द जरा झोंवलेच. पण तेवढ्यात दिलासा देणारी पत्रे हाती पडली. दोन ठिकाणची दोन पत्रे. एक होते पदव्युत्तर शिक्षणासाठी मिळालेले प्रवेशपत्र नि दुसरे होते नोकरी मिळाल्याचे. सुनील बुचकळ्यात पडला. आता त्याला दोन वाटा खुणावीत होत्या. त्यातून निवड करण्याचा पेचप्रसंग येऊन पडला. त्याने बाबांचा सल्ला घेतला. ते म्हणाले— 'हे बघ सुनील,तुझे अजूनही शिक्षणाचे वय आहे. तू हुशारही आहेस. तू शीक. मी अजून नोकरी करतो आहे. शिवाय तुझा दादाही नोकरीला लागला आहे. तेव्हा इतक्यात तू नोकरी केलीच पाहिजे असे नाही. तू हा अभ्यासक्रम पूर्ण कर नि मग नोकरीचा विचार कर.' पण सुनीलने अगोदरच विचार केला. तो म्हणाला— 'तुम्ही म्हणता ते खरे असले तरी हा अभ्यासक्रम पूर्ण करूनही आज मिळत असलेल्या जागेसारख्या नोकरीसाठीच मी खटपट करणार, ती जर आजच मिळते आहे तर ह्या अभ्यासक्रमात व्यर्थ वेळ कशाला घालवू? शिवाय तीन महिन्यापासून मी 'बेकार' आहे ना? तुम्ही मला पैसे पुरवलेत तरी ते उत्पन्न माझे स्वतःचे असणारच नाही. मला आता नोकरी करणेच इष्ट वाटतंय.'

आज सुनील मजेत आहे. दोनतीन वर्षात त्याला पगारवाढदेखील झाली आहे.

हा गौतम—कल्याणी युनिव्हर्सिटीचा विद्यार्थी—ॲग्रिकल्चर ही त्याची लाईन. तीन वर्षाचा अभ्यासक्रम पण काही ना काही कारणास्तव युनिव्हर्सिटी बंद पडायची. मुख्य उपद्रव होता नक्षलवाद्यांचा. दरवर्षी परीक्षा लांबायच्या. अभ्यासक्रम पूर्ण व्हायला तीन वर्षांऐवजी पाच वर्षे लागली. आता गौतमची

फक्त शेवटची परीक्षा उरली.

—इथे थोडेसे विषयांतर होतय. पण हरकत नसावी. ह्या डिसेंबरात आमच्याकडे B. A., B. Com., B. Sc. ह्या परीक्षा होताहेत. नुकतेच महाराष्ट्रातून एक पाहुणे आले होते. त्यांनी परीक्षेबद्दल ऐकले. म्हणाले—ह्या भलत्या वेळी परीक्षा कशा काय ? हा काय परीक्षेचा सीझन ? आम्ही म्हटले इथे सीझनला महत्त्व नाही, सुविधेला महत्त्व आहे. अहो, आता ह्या परीक्षा होताहेत (म्हणजे आठ महिने उशीरा) हे भाग्यच समजायचे. M. B. B. S. च्या परीक्षा चक्क दीड वर्ष लांबल्या होत्या.

—तर गौतमची गोष्ट अशी. यावर्षी तो फायनल परीक्षा देणार होता. B. S. C. (agri.) ची पदवी घेणार होता. पण अचानक त्यांला नोकरी मिळाली. रांचीला रुजू व्हायला चाललोय म्हणून सांगायला तो आला. मी 'मिष्टीमुखेर व्यवस्था' केली. मग म्हटले—काय रे, तुझे हे फायनल इयर. आता तर तू ही नोकरी पत्करलीस. अभ्यास नाही करणार ? डिग्री नाही मिळवणार ? तो चटकन म्हणाला—डिग्री मिळवलेले किती जण तरी बेकार बसले आहेत. मी डिग्री मिळवून तरी अशाच नोकरीसाठी अर्ज करणार. परीक्षेच्या फंदात पडलो तर हातची नोकरी जाईल. मग त्या डिग्रीला काय अर्थ उरला !'

गौतम निघून गेला. सुनीलचे उदाहरण ताजेच होते. गौतमने ह्याचीच पुनरावृत्ती केली.

मला वाटले—सगळ्या मुलांना अशा भराभरा नोकऱ्या मिळतील तर उच्च शिक्षणाची यातायात करून बेकार राहण्याची पाळी तरी त्यांच्यावर येणार नाही ! निदान जोवर शिक्षणाचा उद्देश ज्ञानार्जन नसून अर्थार्जन हाच आहे तोवर तरी हे असेच होत राहावे ! ☐☐

---


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही वरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**


---

विधानसभेतील प्रश्नोत्तरांवर आधारित

# 'अजब तुझे सरकार !

सु. ल. सोमण

प्रश्न क्रमांक १९४९७ : दिनांक २९ ऑगस्ट, १९७३ : आमदार श्री. शं. ग. कोर्डे, शिर्डी.

—सन्माननीय आरोग्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. चोपडे तालुक्यातील डोंगरघोडे येथे नदीचे पाणी प्याल्यामुळे एप्रिल १९७३ मध्ये काही व्यक्ती मृत्यू पावल्या, हे खरे काय ? असल्यास किती ?

२. या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय ? त्याचा निष्कर्ष काय आहे ?

३. दूषितीकरणास प्रतिबंध करण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आली आहे ?

**उत्तर : आरोग्य मंत्री डॉ. रफिक झकेरिया**

१. डोंगरघोडे नावाचे गाव जळगाव जिल्ह्यातील चोपडे तालुक्यात नाही. त्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

२. प्रश्न उद्‌भवत नाही.

३. प्रश्न उद्‌भवत नाही.

—डोंगरघोडे चोपडे तालुक्यात नाही, तेव्हा ते इतर कुठे नदीकाठी असले व तिथे कुणी मृत्यू पावले असले तर ते समजावे कसे ? एखाद्या गावाचा निदान संपूर्ण भूगोल तरी माहीत असावा की नाही प्रश्न विचारण्यापूर्वी ! पण आमदार लोकच ते. मिळाली माहिती की विचार प्रश्न !!

—आमदार श्री. कोर्डे शाळेत शिकत असताना महाराष्ट्र राज्य पाठ्य-पुस्तक मंडळाचे भूगोलाचे पुस्तक त्यांच्या वर्गाला बहुधा लावलेले नसावे. साहजिकच, डोंगरघोडे गावाबावत त्यांना माहिती नसावी ! त्यामुळे त्यांना मिळालेल्या मृत्यूंची शहानिशा होऊ शकली नाही हे त्या मृत्यू पावलेल्या (?) व्यक्तींचं दुर्दैव !! ◻

प्रश्न क्रमांक १६३१५ : दिनांक २४ ऑगस्ट, १९७३ : आ. श्रीमती विमल रांगणेकर, ठाणे.

—सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. ठाणे जिल्हा कार्यालय व इतर जिल्हा कार्यालये एका मध्यवर्ती ठिकाणी आणण्याबाबत व त्यासाठी स्वतंत्र

इमारत बांधण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून ५–६ वर्षांपूर्वी प्रकरण शासनाकडे आले आहे हे खरे आहे काय ? असल्यास त्याबाबत काय निर्णय घेण्यात आला ?

२. अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

३. जिल्हाधिकाऱ्याच्या सूचनेनुसार इमारत बांधल्यास वार्षिक भाड्यापोटी होणाऱ्या खर्चांत किती बचत होईल असा अंदाज आहे ?

**उत्तर : महसूल मंत्री भाऊसाहेब वर्तक :**

१ व २. होय. या प्रस्तावाच्या आराखड्यांची व अंदाजपत्रकांची संबंधित प्रशासकीय विभागात छाननी चालू होती. आता हे काम पूर्ण होऊन प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही चालू आहे.

३. रु. ४२,९६३.

प्रस्तावाच्या छाननीसाठी फक्त ५-६ वर्षे गेली, तेव्हा मान्यतेच्या कार्यवाहीस आणखी किमान ५–६ वर्षे तरी लागतीलच असे गृहीत धरायला हरकत नाही.

दहाबारा वर्षांतील, ह्या प्रस्तावाची जुळणी, छाननी, मान्यता ह्यात गुंतलेल्या कर्मचाऱ्यांचे एकूण वेतन किती असाही प्रश्न विचारायला हरकत नव्हती !

हे एकूण वेतन ह्या दहा-बारा वर्षांतले भाड्यापोटीचे ४–५ लाख रुपये एवढासाच काय तो करदात्याला मोगावा लागणारा ज्यादा आर्थिक बोजा ! ! ◻

## मुंबईतील विक्रीकराची थकबाकी

प्रश्न क्रमांक : १४२२९ : दिनांक ७ ऑगस्ट, १९७३ : आमदार श्री. ह. न. त्रिवेदी, वाळकेश्वर, मुंबई आमदार श्री. द. श्री. नातू, गुहागर. आमदार श्री. त्र्यं. सी. कारखानीस, कोल्हापूर

सन्माननीय वित्त मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१ : १ एप्रिल १९७३ ते ३१ मार्च १९७३, या वर्षात बृहन् मुंबईतून विक्रीकराच्या किती रकमेचा भरणा शासकीय खजिन्यात करण्यात आला ?

२ : ३१ मार्च १९७३ अखेर विक्रीकराची किती थकबाकी बृहन्मुंबईतील व्यापाऱ्यांकडून येणे होती ?

३ : विक्रीकराची ही थकबाकी गेल्या २ वर्षात बरीच वाढली आहे हे खरे आहे काय ? असल्यास त्याबाबतची थोडक्यात कारणे काय आहेत ? व ही थकबाकी त्वरित वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

४ : बाकी वसूल करण्यासाठी महसुली अधिकाऱ्याचे अधिकार हेबळे अहवालानुसार विक्रीकर आयुक्तांना देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**उत्तर : वित्तमंत्री ना मधुकरराव चौधरी**

१ : एप्रिल १९७२ ते ३१ मार्च, १९७३ या वर्षांत बृहन्मुंबईतून विक्रीकराच्या रकमेचा खाली दर्शविल्याप्रमाणे भरणा करण्यात आला.

| | | रुपये |
|---|---|---|
| १. मुंबई विक्रीकर अधिनियम : | | ९५,६८,९२,९१३ |
| २. केंद्रीय विक्रीकर अधिनियम : | | ३८,२६,८५,३९० |
| ३. मोटार स्पिरीट अधिनियम : | | १२,५८,९४,५९१ |
| | एकूण | १,४६,५४,७२,८९५ |

२ : ३१ मार्च १९७३ पर्यंत विक्रीकराची बृहन्मुंबईतील व्यापाऱ्यांकडून खाली दर्शविल्याप्रमाणे थकबाकी येणे होती :

| | | |
|---|---|---|
| १. मुंबई विक्रीकर अधिनियम : | | २३,३९,९६,६९२ |
| २. केंद्रीय विक्रीकर अधिनियम : | | ३,८०,३४,७३० |
| ३. मोटार स्पिरीट अधिनियम : | | ४८,४७४ |
| | एकूण | २५,२०,७९,८९६ |

(वरील थकबाकी मेळजुळणी पूर्वीची आहे.)

३ : होय. त्याला कारणे अशी :

क : निर्धारणेच्या कामाचा वेग वाढल्याने होणारी महसूल वाढ.

ख : उलाढालीतील वाढ आणि

ग : अपिलातून मिळालेले स्थगितीचे आदेश.

त्वरित वसुलीसाठी उपाययोजना

अ : प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्यासाठी तगादा लावला जातो.

आ : थकबाक्यांची प्रकरणे त्वरित महसूल अधिकाऱ्याकडे पाठविली जातात.

इ : विक्रीकर उपायुक्त (प्रशासन ३), मुंबई यांना जिल्हा अधिकाऱ्यांचे महसुली अधिकार दिले आहेत.

ई : ज्यास्त रकमेची अपिले त्वरित निकालात काढली जातात व

उ : वसुलीच्या कामासाठी ज्यादा नोकरवर्ग दिला आहे.

४ : महसुली अधिकाऱ्यांचे अधिकार विक्रीकर उपआयुक्त (प्रशासन ३) मुंबई यांना देण्यात आलेले आहेत. मात्र हेबळे अहवालामध्ये अशा तऱ्हेची शिफारस नसून ह्याच्या (नेमकी) विरुद्ध आहे.

दाखवल्या गेलेल्या विक्रीकर भरण्याचे व थकबाकीचे आकडे एवढे न दाखवल्या गेलेल्या विक्रीवरील बुडालेल्या कराचे आकडे कदाचित ह्यापेक्षा अधिक असावेत. त्यांच्या वसुलीसाठी काही योजना आहे काहो ?

कोटयवधि रुपयांची करांची थकबाकी असणाऱ्या ह्या व्यापाऱ्यांना कारखानदारांनाच औद्योगिक कलहात संरक्षण मिळते, त्यासाठी काही 'सरचार्ज' मोठ्या स्वरूपात लावता आला तर ?

हेबळे अहवालातल्या शिफारशीच्या नेमकी विरुद्ध कार्यवाही शासनाची केली आहे ह्यात नवीन ते काय ? चुकविण्यात येणाऱ्या कराविरुद्ध व काळ्या पैशाविरुद्ध वांच्छू समितीचा अहवाल

बासनात बांधण्यात आलाच आहे नाही का ? तेव्हा महाराष्ट्र शासन केंद्राचे अनुकरणच फक्त करीत आहे ! ◻

## मिरजेचा पाणीपुरवठा : मंत्र्यांचं आश्वासन !

प्रश्न क्रमांक १४९८९ : दिनांक २९ ऑगस्ट, १९७३
प्रश्न : आमदार डॉ. न. रा. पाठक, मिरज

सन्माननीय पाटबंधारे मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. माननीय पाटबंधारे मंत्री यांनी मिरजेस भेट देऊन मिरज येथील कृष्णा नदीच्या घाटावर कायम स्वरूपाचा बंधारा तात्काळ बांधण्याचे आश्वासन दिनांक १ ऑक्टोबर, १९७२ रोजी दिले होते हे खरे आहे काय ?

२. मिरज घाटावर बंधारा नसल्याने नदीचे पात्र कोरडे रहाते. त्यामुळे नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होते, हे खरे आहे काय ?

३. असल्यास त्याबाबत पुढे काय कारवाई करण्यात आली आहे ?

**उत्तर : पाटबंधारे मंत्री श्री.वसंतराव दादा पाटील**

१. मा. पाटबंधारे मंत्री यांनी दिनांक १७ नोव्हेंबर १९७२ रोजी भेट दिली. त्यावेळी मिरज घाटाची व बंधाऱ्याच्या जागेची पाहणी केली. परंतु प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे आश्वासन दिलेले नाही.

२. होय.

३. मिरजेसाठी छोटा बंधारा व अर्जुनवाडीला जोडणारा पूल यांचा एकत्रित रीत्या विचार करण्यात येत आहे.

बिच्चारे मंत्री ! कुठेही गेले की त्यांच्या नावाने एखादं आश्वासन चिकटवून दिले जाते. त्याचा मग त्यांना इन्कार करणं भागच पडतं ! ! नि मग उगीचच साफ चुकीचा प्रचार बिचाऱ्या मंत्र्याविरूद्ध सुरू होतो, ' आपण असं बोललोच नव्हतो ' असं म्हणण्याची आजची मंत्री टाईप रीतच आहे ! '

मिरजकरांनो, तूर्त विचार चालूच आहे. पुढल्या भीषण दुष्काळात नवीन आश्वासन मिळेलच, तेव्हा पाण्याची काय काळजी ?

◻ ◻ ◻


# एका पराभवाची कहाणी

ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन

या निवडणुका म्हणजे एक प्रचंड बकासूर झाला आहे

# मुक्काम अलाहाबाद

रमेश जोशी

'देरीसे जो आपको कष्ट हुए हैं, हम आपकी माफी चाहते है। हवाई जहाज जो कानपूर होके अलाहाबाद जानेका था वह अब अलाहाबाद नही जाएगा। अलाहाबादके यात्रिओंको सूचना है, वे अभी बनारसके हवाई जहाजसे बनारस चले जाए। ४ एम. अलाहाबाद एक्स्प्रेस दो घंटा देरीसे जाएगी।' या व अशा प्रकारच्या सूचना आता अंगवळणी पडल्या आहेत. अलाहाबादला जायचे म्हणजे या सूचना ऐकण्याची व त्याप्रमाणे वागण्याची तयारी असायलाच हवी. अलाहाबाद म्हणजे एक अत्यंत बेशिस्त शहर. कुंभकर्णाप्रमाणे अस्ताव्यस्त पसरलेले. कुंभकर्णाप्रमाणेच झोपलेले. काळाच्या मागे कित्येक शतके. शतकानुशतकांच्या रूढीची पुटे अंगावर बाळगणारे. तीन तीन प्रधानमंत्री हिंदुस्थानला देऊनही कोणताही फरक न स्वीकारणारे. गंगा व यमुना यांचा अभिमान बाळगणारे. ४–५ लाख रुपये मेळ्यांवर, मेळ्यांच्या झांकीवर महिन्याला खर्च करणारे. आळसलेले, ऐदी, सुस्त, निष्क्रिय, भांडखोर.

अशा या शहराचे दोन भाग पडतात. इतर कोणत्याही शहराप्रमाणे.समाजाच्या दोन स्तरांमधून रेल्वेमार्ग रेखा आखतो. जुने अलाहाबाद अत्यंत गचाळ, गलिच्छ. अरुंद रस्ते, रस्त्याच्या कडेला फेरीवाले, भिकारी, साधू यांचीच गर्दी. रस्त्याच्या कडेला बाजूंच्या इमारतींना ढकलीत रहदारी चालू असते. सायकल, रिक्षा व रामायणकालीन रथ, ज्यांना एक्के म्हणतात, यांच्या गर्दीतून वाट काढून चालताना नाकी नऊ येतात. पावलापावलागणिक पानाचे ठेले. त्याभोवती माणसांची व माशांची गर्दी. झीरो रोडच्या भिंती, नुकताच गणपती होऊन गेल्यासारख्या पानाच्या पिकांनी लाल लाल. चौकाचौकात पुतळ्यासारखा उभा असलेला पोलीस. ट्रॅफिक लाईटची नियमितपणे कवाईत चालू. पोलीसचा व रहदारीचा तसा काही संबंध नाही.

रहदारीचा व ट्रॅफिक लाईटचाही काही संबंध नाही. ज्याला जशी वाट मिळेल तसा तो जात असतो.

आमच्या पुणेकरांना जंगलीमहाराज रस्ता ८० फुटी झाला तर काय अभिमान. पण नव्या अलाहाबादेत सर्व रस्ते आखीव, रेखीव १६० फुटी. पण पक्की सडक फक्त २० फुटी. चौराहावर मध्यभागी एक सीमेंट कॉंक्रीटची छत्री व छत्रीवर दिवा. रात्रीच्या वेळी छत्रीखालचा पोलीस दिसत नाही. लोकांना पोलीस दिसत नाही म्हणून पोलीसचा उपयोग नाही. पोलिसाचा उपयोग नाही म्हणून पोलीस बिडचा फुंकीत छत्रीखाली बसून रहातो. नवीन अलाहाबादेत झाडी मात्र भरपूर आहे. रस्त्याच्या दोन्ही अंगांना बोगनवेली सदा रंगीत दिसतात. रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुबक बैठी दुकाने, काऊंटर्स, टेबल. असे मोकळ्यावर बसून छोले, भटुरे, नाहीतर आलुपराठे खायला मोठी मजा येते.

अलाहाबादपासून घेण्यासारखी असेल तर एवढीच चांगली सोय. तर असे हे अलाहाबाद.

सकाळी ९॥ चा सुमार. मी आपल्या workshop मध्ये बसलो आहे. अलाहाबादमध्ये कामगारांचा प्रश्न जरा वेगळा आहे. कामगार भरपूर. ऊंचनिच, धट्टेकट्टे पण काहीकाही वेळा असे वाटते की मानेच्यावर या लोकांची वाढ होतच नाही की काय? आकलनशक्ती बिलकूल नाही. तुमची जरा पाठ वळली की खुशाल पानतंबाखू खात बसून रहातात. पुणे कोल्हापूर इकडील कामगार वजनाने या कामगारापेक्षा निम्मा आहे पण कामाला दसपट आहे. तर अशा लोकाकडून काम करून घेत बसलो आहे. समोर एक सहा फूट उंच, रुंद छाती, पिळदार मिशा असा भैय्या येऊन उभा रहातो, 'साऽऽब, कुछ पैसा दो. आपला एवढा मोठा शॉप आहे. रुपया दोनरुपये द्या.' मी त्याच्याकडे पहातच रहातो. भीक मागणेसुद्धा नरमाईने नाही. हक्काने. 'चांगला तगडा आहेस. काम का करीत नाहीस? नसेल मिळत तर मी काम देतो!' 'हाँ भावजी कोई काम दे दीजीएगा. जरुर कर देंगे!' तो म्हणतो, वर्कशॉपच्या आजूबाजूला खूप झुडूपे वाढलेली असतात. मी त्याला ती साफ करायला दाखवतो. फावडं घमेल घेऊन तो निघून जातो. मी पुनः माझ्या कामाला लागतो. दोन तासांनी माझ्या लक्षात येते. भैय्या काय करतोय ते मी पहायला जातो. घमेलं भिंतीजवळ व घमेल्यावर भैय्या. मी चक्रावून जातो. 'अरे तुला काम दिलं होतं ना?' 'भावजी, खाली पेट कैसे काम होएगा' मी मुकाट्याने रुपया काढून देतो. दोन तासांनी येऊन पहातो तो पंचा उशाला घेऊन भैय्याजी झकास वामकुक्षी करताहेत. मी तिरसटून त्याला उठवतो. 'साब भरी पेट कैसा काम हुआ? थोडावेळ झोपलो होतो.' 'ठीक ठीक. अभी अच्छी तरहसे काम करना.' त्याला कामाला लागलेला पाहून मी पुनः आपल्या कामाकडे वळतो. पुनः दोन तासांनी पहातो तो भय्याजी

सावलीला, पानतंबाखू चालू. आता मात्र मी संतापतो. जाऊन त्याला चांगला झाडतो. दीनवाणा चेहरा करून तो म्हणतो, 'साब, सूरज इतनी चढी है काम कैसा हुआ ! माझा संयम अजून शिल्लक आहे. कदाचित् दिलेला रुपया वसूल करण्याच्या इच्छेने असेल. हताश होऊन मी परत येतो. ४–४।। वाजता पुनः चक्कर मारतो व त्याला म्हणतो 'आता सूर्य उतरला. चलो शुरू करो ! निर्लज्जपणे तो म्हणतो, 'साब खाना खाके छे घंटे हुए बडी भूक लगी !' आता मात्र माझा संताप होतो. संयम संपतो व त्याला मी हाकलून लावतो. गेलेला रुपया मात्र मनांत ठसठसत रहातो.'

तर असे हे भैय्ये, अलाहाबादमध्ये रहाणाऱ्या एका मराठी माणसाने त्यांचे मोठे मार्मिक वर्णन केले–

**मेला, मिट्टी, बरात भैय्या**

**बल्लम, बाजा, बायसिकल**

अलाहाबादमध्ये महिन्यातून एकदा मेळा हा असतोच. एक मेळा म्हणजे भैय्याची चार दिवस सुट्टी. दानधर्म खूप होतो. मोफत खायला प्यायला मिळते हे त्याचे एक आकर्षण. कोणाच्याही मर्तिकाला जायचे मग त्याची ओळख असो वा नसो. कामधंदा बुडाला तरी हरकत नाही. यात्रेहून परत आल्यावर शिरापुरी फुकट खायला मिळते. कितीही थोड्या ओळखीवर भैय्याजी चालले बराती म्हणून. आठ एक दिवस लग्न चालते. बडी खुशी हो जाती है. या भैय्यांच्या गरजा तरी किती कमी ! बलम म्हणजे दंडा. बाजा म्हणजे ट्रांझिस्टर. जवळचे किडूक मिडुक विकतील व 'बाजा' विकत घेतील. बायसिकल म्हणजे जीव की प्राण. सायकलवर टांग मारली, डोक्याला पंचा गुंडाळला की भैय्या शंभरएक मैलाची रपेट सायकलवरून सहज मारतो. अलाहाबादहून काशीला भैय्या विश्वेश्वराच्या दर्शनाला जातो सायकलवरून. अंतर फक्त ९० मैल. आणि अशा वर्षातून ५–७ चकरा. बरोबर बल्लम आणि बाजा.

मी कारखान्यातून बाहेर पडतो. बाहेर माझा नेहमीचा रिक्षावाला उभा असतो. रिक्षा साऱ्या बाजूंनी सुशोभित केली आहे. नवीन रंग, कागदाच्या झिरमिळ्या फुले, कलाबतू, बसावयाच्या जागेवर कोणे एकेकाळी नवा असलेला बहुधा निळा गालीचा, चाकांना घुंगरू, मी पहातच रहातो. 'काय भैय्याजी आज काय' माझी मिरवणूक आहे काय ? मी विचारतो. 'नही भावजी, आज कटराकी झांकी है ! रामलीला बहोत धूमसे होगी। माझ्या रिक्षातून राम सीता झांकीमे जाएगी !' 'राम सीता ? कौन राम सीता? मी अचंब्याने विचारतो. त्या नाटकात राम सीतेचे काम करणारी जोडी घरापासून रंगरंगोटी करून, राम सीतेचे कपडे घालून त्याच्या रिक्षातून जाणार असते. आता खुद्द देवाजीची स्वारी २० व्या शतकातील सायकल रिक्षातून जाणार मग रिक्षा सजवायला नको ? वीस वर्षे तो



# विवाह

विवाह ही आयुष्यातील एक सुखद घटना
खरी, पण आजच्या काळात मात्र लग्नसोहळा
ही मोठ्या खर्चांची बाब झाली आहे.

तुमच्या मुलीच्या लग्नाला लागणाऱ्या पैशांची
व्यवस्था तुम्हालाच करायला हवी.
आयुर्विम्यानं मुलीच्या लहानपणीच ही तरतूद
तुम्हाला सहज करता येईल.

तुमच्या मुलीच्या विवाहासाठी
विमा पॉलीसी घेणं हे तुमच्या सारख्या
दूरदर्शी पित्यास नक्कीच आवडेल.

आयुर्विम्याला पर्याय नाही !

PRATIBHA 1510-11 MAR

रिक्षा चालवतो आहे. वीस वर्षांनंतर त्याला आज पहिल्यांदा मोका मिळाला आहे. हा मोका मिळवण्यासाठी त्याने पन्नास रुपये खर्च केले आहेत. पन्नास अधिक खर्च करून रिक्षा सजवली आहे. कशासाठी ? आपणाकडे गणपती बसतो तशा मोहल्या मोहल्यातून झांकी उभ्या रहातात. प्रचंड रोषणाई, मिठाईची खिरापत, दहा दिवस जल्लोष चालतो. प्रचंड उधळपट्टी. गेल्या वर्षी सबंध उत्तर प्रदेशात ५०% वीजकपात होती. पण झांकीला कुठे काही कमी पडले नाही. कोणत्यातरी राजकीय पुढाऱ्याच्या आशीर्वादाने हे सारे चालू होते.

आमचे घरमालक जनसंघाचे नगर-पिते. त्यांना मी विचारतो – उत्तर प्रदेशात एव्हढी वीजकपात आहे आणि तुम्ही एवढ्या मिरवणुकी कशा काढता? हे थांबवीत का नाही ?' ते म्हणतात ' देखिये साब, ऐसा है, हम आये है चौबे का छब्बे बननेके लिये, ये बंद करनेकी हम कोशीश करे तो दुबे बन जायेंगे। हम क्यो करे। कांग्रेसवालोने करना चाहिये ! और वो भी नही कर सकते। ७४ मे इलेक्शन है न !'

माझ्या मनात विचार येतो आमचे राजकारण, समाजकारण, सामाजिक व्यवस्था, सुधारणा या साऱ्या निवड-णुकां भोवती फिरत आहेत. या निवड-णुका म्हणजे एक प्रचंड बकासूर झाला आहे. जे काय समोर दिसेल ते तो खात सुटला आहे. हा राक्षस पैसे खातो, माणसे खातो, आमची विचारशक्ती खातो, इतकेच नव्हे तर आमचे राष्ट्रीय चारित्र्यदेखील खातो. हा एवढा माज-लेला बकासूर मारण्यासाठी आमच्याकडे कोणी भीम नाही का ?

अलाहाबाद विद्यापीठाचा विद्यार्थी-मंत्री म्हणून ५० शीला आलेला, विधान-सभा बंद झाल्यामुळे मोकाट सुटलेला एक आमदार दोन-तीन लाख रुपये खर्च करून निवडून येतो. निवडून आल्या-बरोबर संपाची हाक देतो. कशाकरता ? या ५० वर्षाच्या बुढ्ढयाला विद्यार्थ्यांच्या प्रश्नाशी काय घेणे आहे काय देणे आहे ? केवळ याची सत्तातृष्णा भागवली जाते. आमचे विद्यार्थी तर काय अननु-भवी आहेत. त्यांना आपले हित कळत नाही. प्रश्न सोडवले जातात केवळ निवडणुका आल्या की. आणि मग लखनौसारख्या आगी लागतात. तेथला एक विद्यार्थी मला म्हणाला, सबंध भारतात U. P. मधील विद्यार्थी राज-कीयदृष्टया- जागृत आहे. मी मनात म्हटले कसला जागृत आहे. पैसा आणि सत्ता या दोन गोळ्या चढवून धिंगाणा घालतो आहे.

तर असे हे अलाहाबाद. २५०० कर्मचारी असलेल्या एका प्रचंड सरकारी उद्योगात २६ दिवसांचा संप झाला. २६ दिवसांच्या संपानंतर कामगारांचा प्रचंड विजय झाला. रोषणाई, मिठाई वगैरे सर्व काही झाले. प्रत्यक्षात ७ दिवसांच्या पगारी सुट्टीत एका जादा सुट्टीची भर पडली. पण प्रचंड यशाच्या तोऱ्यात नफ्यातोटयाचा हिशोब करायला सवड होती कोणाला ? रूढीप्रीयता अंधश्रद्धा

हा जर धर्म असेल तर तो येथे १००% आहे. परवाच्या पावसाळ्यात गंगेच्या पाण्याची पातळी आठ फुटांनी वाढली व गंगेचे पाणी संगमावरून यमुनेच्या भागात झेपावले, घुसू लागले. कोणीतरी अफवा उठवली जमुनेच्या तीरावरील एका ऋषीला तपश्चर्येत यश आले. आले. गंगामाई त्याला भेटायला यमुनेत घुसली. यमुनेच्या तीरावर चार पाच लाख पब्लिक जमा झाले. ऋषीचा जोरदार शोध चालू होता. सापडला की नाही कोण जाणे. पण दोन दिवस कामधंदा सोडून लोक तलास घेत होते. अलाहाबादच्या स्टेशनावर कुटुंबवत्सल परका उतरला की गिधडासारखे टपून बसलेले पंडे त्याच्यावर हल्ला चढवतात. अशा प्रवाश्यांच्या सामानाचे, अंगावरील कपडयांचे लचके या गिधाडांनी तोड-लेले मी पाहिले आहे. तरीही संगमा-वरच्या गटारात आंघोळ करायला भाविक येतच असतात. लचके गमावून मनाला शांती देवून विचारे परत जातात. मनःशांती खरोखरच मिळते की मनाची एक फसवणूक करून घेतात कुणास ठाऊक ! भिकारी, पंडे, यांना भीक पुष्कळ मिळते. दाता केवळ प्रतिष्ठेसाठी दान करतो पण दानाची प्रतिष्ठा मात्र येथे दिसत नाही. तिचे पं. मदनमोहन मालवीयांबरोबरच दहन झाले.

वरील चित्र हे थोडयाफार फरकाने भारतातल्या कोणत्याही शहराचे असू शकेल. काय मजा आहे पहा. तांत्रिक ज्ञान, उद्योगधंदे, कौशल्यपूर्ण उपकरणे, अणुविज्ञान, गणकयंत्राचे तांत्रिक ज्ञान यात आम्ही बरीच मजल मारली आहे. त्या त्या क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती दिवसरात्र, तन, मन, धनाने त्यातील अधिकाधिक प्राविण्यासाठी झगडत आहेत. पण ज्या समाजासाठी हे सारे करायचे तो मात्र निष्क्रिय, अंधश्रद्धा आणि रूढी यांच्या रोगाने थंडगार गोळ्या-प्रमाणे पडून आहे. त्याला कशाची खंत नाही, कशाचा आनंद नाही. स्वार्थत्याग करण्याची इच्छा नाही, आहे हे छान आहे, त्याला समाधान आहे. प्रश्न पडतो तो हा की कमी गरजा ठेवण्यात, काम न करण्यात, आहे त्यात समाधान मानण्यात खरे सुख आहे की उमेदीने तडफड करण्यात, नव्या नव्या नोकरी बाबत सवलती तयार करण्यात, प्रचंड प्रकल्प उभे करण्यात, राष्ट्रीय संपत्ती वाढविण्यात, नवे नवे शोध लावण्यात खरे सुख आहे ?

● ● ●


# फिडेल, चे आणि क्रांती

**अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन**

पुस्तक परीक्षण

# निरभ्र

## गोष्ट तशी साधीच

**प्रा. ग. भा. जोशी**

दिनकर या तरुणाची ही एक भोग-कथा आहे. आत्मनिवेदनात्मक पद्धतीने दिनकरनेच ही कहाणी कथन केली आहे. कथानक आणि निवेदन पद्धत सरळ अन् साधी आहे. श्री. फडके कालीन कादंबरीच्या तंत्रमंत्रात न गुरफटलेली ही कादंबरिका असल्यामुळे कथानकात कुठे गुंतागुंत, निरगाठ, उकल हा प्रकार नाही. या चाकोरी बद्ध तंत्रातून बाहेर पडलेली 'निरभ्र' ही कादंबरी आहे.

गोष्ट तशी साधीच. दक्षिण रत्नागिरीतील एखाद्या तालुक्याच्या ठिकाणी घडलेली. दिनकरच्या मामांची गावात एक खाणावळ आहे. मामा सरळ अन् साधा आहे. आपला व्यवसाय बरा की आपण बरे! ४ मेंबर्सना जेऊखाऊ घालणे, खाणवळीची व्यवस्था पहाणे हे त्याचे नित्यकर्म! उरलेला वेळ देवाचे भजन-पूजन—आणि त्यातल्या-त्यात दत्तभक्ती! दत्तसांप्रदायाची व दत्तस्थानाची त्याच्या मनाला विलक्षण ओढ आहे. दिनकरच्या बालपणीच त्याचे आई-वडील वारल्यामुळे, या अनाथ पोराला मामांनीं आपल्या आश्रयाला आणून ठेवला आहे. मामीसुद्धा मामासारखीच. खाणावळीचा राबता उपसणारी. दिनकरवर दोघांचेही अपत्यवत् प्रेम—मामीचं थोडसे अधिक!

पुढे काही दिवसांनी मामाला मुलगी होते. 'रतन' तिचे नाव. अतिशय देखणी, हुशार. रतन व दिनकरच्या बालपणापासूनच त्यांचा विवाह करायचा असे मामामामी ठरवितात. दिनकर प्रकृतीने सुदृढ, देखणा. वाढत्या वयाबरोबरच रतन-बरोबरच्या शृंगाराची जाणीव वाढतच असते. दोघंही वयात येतात. दिनकरच्या वासना रतनला वेळोवेळी पाहून चाळवतात, भडकतात. कामवासनेच्या आणि तारूण्याच्या मस्तीने देखील!

रतनला शाळेत नेरूरकर म्हणून शिक्षक कविवर्य तांब्यांच्या कविता रसाळपणे शिकवितात. त्यांची रतनला भुरळ पडते. नेरुरकर हाडकुळे पण भावुक व मोठ्या डोळ्याचे—तिला भारी आवडतात.

इथेच रतन-दिनकर संबंधावर पहिली ठिणगी पडते. नेरुरकर खाणावळीचे मेंबर होतात. नेरुरकर आणि रतन यांचा परिचय आणि भावबंध दृढ होतो. कातळावर भेटी गाठी होतात आणि दोघे विवाहाचे निश्चित करतात. यामुळे दिनकर पेटून उठतो. त्याची

मित्रमंडळी त्याला चिथवतात, चिडवतात. या प्रकरणाचा सोक्षमोक्ष करण्याकरिता एक दिवस दिनकर रतनला जाब विचारतो. तिचे उत्फुल्ल तारुण्य त्याच्या नजरेत भरते. ती दिनकरला नकार देते आणि मास्तरांशी विवाह करण्याचा निश्चय करते. संतप्त दिनकर मास्तरांना मारण्याचा अयशस्वी प्रयत्न करतो. मामामामीही रतनच्या एकुलत्या-एक पोरीच्या-इच्छेच्या आड येत नाहीत. थोड्याच दिवसात रतन सौ. नेरूरकर होते.

दिनकर, मास्तर आणि रतनवर सारखा जळत असतो. कळत न कळत मास्तरांशी आपली तुलना करतो. मास्तरांची शैक्षणिक पात्रता, काव्य, कला, साहित्य यांची आवड हे गुण विशेष श्रेष्ठ असतात. दिनकरच्या तुलनेने मास्तरांचे वैगुण्य म्हणजे त्यांचे शारिरीक दुबळेपण. मास्तरांबरोबर रतन कसा शृंगार करणार याच विचारात दिनकरचे मन सतत घोटाळत असते. दिनकरची व्यथा मास्तर जाणतात. भावा बहिणीचे नाते जोडायचा प्रयत्न करतात. दिनकर हे कृत्रिम आणि नको असलेले नाते नाकारतो तेव्हा रतन दिनकरला सांगते 'आपलं प्रियकर-प्रेयसीचे नाते रूजले नाही.' यापुढे मात्र दिनकर रतन आणि मास्तर यांचा विचारही मनात आणायचा नाही असे ठरवतो.

४ वर्षे लोटतात. नेरुरकर मास्तर टी. बी. ने पछाडले जातात. शक्यते सारे उपाय केले जातात. आपल्या शेटच्या क्षणी ते सांगतात 'दिनकर, गेल्या ४ वर्षात रतन लौकिक अर्थाने माझी पत्नी झालेली नाही. विवाह होऊन ती कुमारीच आहे.' पुनः एक ठिणगी पडते. मास्तरांची जीवन यात्रा संपते. घर उदासवाने होते. मामा मामी गाणगापूरला जातात. केवळ रतन व दिनकर घरी राहून खाणावळ चालवितात. रतन शिक्षिकेच्या नोकरीचा प्रयत्न करते.

नाटकात काम करणारी नटी अंजनी काही क्षण दिनकरला भुरळ घालते. ती दिनकरच्या जीवनात येते तशी अचानक एक दिवस निघून जाते. तिची पहिली आणि अखेरची भट चटका लावते. धक्का देते. बाजार पेठेतील कुलकर्ण्यांची आशा, वराडकरांची पुष्पा, खानोलकरांची मंजू या पोरी दिनकरच्या हाकेसरशी धावून येतात. तो जे हवे ते मुक्तहस्ताने लुटतो. मंजूचे लागेबांधे मात्र विशेष असतात. तिला एक वेडी आशा असते की एकना एक दिवस दिनकर आपल्या गळ्यात मंगळसूत्र बांधील. या आशेपोटी ती फसते. दिनकरचा अंकूर तिच्या पोटी वाढत असतो.

रतन व मंजू यांचे ऋणानुबंध, एकमेकींना आधार देण्यासाठीच वाढत असतात. पण दिनकरच्या मनातील रतनबद्दलचे वादळ दिवसे दिवस घोंगावतच असते. म्हणूनच तो मंजूला झिडकारतो. मंजू केविलवाणी, असहाय्य होते. गाणगापूरला आजारी असणाऱ्या मामामामींना आणायला दिनकर जातो

आणि येताना वाटेत कोल्हापूरला तो विनदिक्कतपणे वेश्यागमनही करतो... थंड होतो...!

रतन शिक्षिका म्हणून सावंतवाडीला हजर होते. मामी दिनकरला देसायांची मुलगी दाखवितात. तिला तो संध्याकाळी फिरायला नेतो आणि तिच्यावर बलात्कार करतो. त्याला कोंडून घालतात. कोकणातील समजुतीप्रमाणे 'देवचार' मानगुटीवर बसला आहे. 'चेडे' चढल्याची चिन्हे आहेत अशा कल्पनेनं त्याच्यावर उपचार करतात. काही दिवसांनी रतन परत येते. 'दिनकरचे वादळ मीच शमविले असते पण मंजूचं काय? ती 'आई' होणार आहे. म्हणून मी तिला आपल्याकडे ठेवले आहे' असे सांगते.

एक दिवस रतन वादळाला जाणून बुजून मिठी मारते. दिनकर बेभानपणे तिच्यावर तुटून पडतो. पण रतन 'थंडगार' असते. दिनकरचे वादळ शमते. रतन, दिनकर, मामी सावंतवाडीला जातात. मंजूला कुंकू व मंगळसूत्राचे लेणे देतात. मंजू मोकळ्या आकाशासारखी निरभ्र होऊन हसते!

**दिनकर**

हे सारे कथानक थोड्याशा सविस्तरपणाने सांगण्याचे कारण असे की, दिनकर ही व्यक्तिरेखा म्हणजे एक Problem-case आहे. भोगी वखवखलेला केवळ शारीरिक भोगाची तृप्ती करून घेणारा, पाशवी, क्रूर संभोगाचाही अवलंब करणारा आहे हे जाणवावं. तसेच वैचारिक, नैतिक किंवा कर्तृत्वाची पातळी नसलेला. कोणाही मुलीवर खरे खुरे प्रेम नसलेला. अगदी रतनवरसुद्धा! केवळ आपली आग, तप्तता, दाह शांत करण्यासाठी त्याला काही खेळणी हवी असतात. त्याच्या आचार विचाराला कोणतीही कसलीही भक्कम बैठक नाही. मग असा एक प्रश्न उपस्थित होतो की, असल्या कथानकातून आणि व्यक्तिरेखेतून लेखकाला काय सूचित करावयाचे आहे? अभिजात वाङ्मयाचे कस आणि उद्दिष्ट जरी क्षणभर आपण दृष्टिआड केले तरी काही अनुत्तरित प्रश्न शिल्लक रहातातच. प्रेम, त्याचे अधिष्ठान, त्याग आणि नीती यावर उभी राहणारी संस्कृती आजच्या आधुनिक जगातील व्यवहारात आणि वाङ्मयातून लुप्त झाली आहे. किंवा काल विसंगत आहे. आणि त्याची जागा मुक्त, क्रूर, पाशवी संभोगाने घेतली आहे. किंवा लिंग पिसाट आणि 'सखाराम' वृत्तीचें प्रदर्शन करणे ही आजची 'गरज' आहे. 'मागणी' आहे म्हणून चित्रण करायचे! की जे खपते आहे, लोकप्रिय होत आहे म्हणून लिहायचे?

**रतन**

ही खरी भावकथा आहे रतनची. तिचे सारे जीवन होरपळलेले, अतृप्त, अभोगी! तरीसुद्धा तिच्या विचाराची, वर्तनाची, प्रेमाची बैठक भक्कम आहे. मास्तरांशी प्रेमविवाह करताना, त्यांच्या आजारात मनोभावे शुश्रूषा करताना, श्राद्धदिनी त्यांचे चिंतन करताना, मंजूच्या दुःखाशी समरस होऊन तिला

आधार देताना ती निश्चयी वाटते. संयमी वाटते. पण अखेरीस वादळाला आत्मसमर्पण करताना तिने कोणता विचार केला ? आणि समजा, ती जर वादळाच्या तडाख्यात सापडली असती तर ती आणि विशेषतः मंजू यांचे जीवन उध्वस्त नसते का झाले ? हे थोडेसे गूढ आणि चमत्कारिक वाटते. पण रतनबद्दल वाचकांना सहानुभूती वाटते याचे खरे कारण मामा मामी मंजू दिनकर इत्यादींना जीवनातील काहीना काही हरपलेले सापडले आहे पण रतन मात्र... एकाकी !

बहुप्रसव लेखक म्हणून मधू मंगेश कर्णिक प्रसिद्ध आहेत. सरावाने काही सुरेख वाक्य ते लिहून जातात. पण 'सोबत' 'तोरण' 'देवकी' मधले मधु मंगेश दुर्दैवाने 'निरभ्र' मध्ये दिसत नाही. त्यांची लेखन वैशिष्ट्ये फारशी जाणवत नाहीत. छाप उमटवीत नाहीत. अस्पष्ट, तुटक, बोथट, ठिसूळ आणि परिणामकारकतेच्या अभावी ही 'कथा' मनाला चटका लावीत नाही. स्मृतीकोषात जतन करावी असे वाटत नाही.

'निरभ्र' लिहिताना त्यांचे कथानक आणि लेखणी अभ्राच्छादित झाली आह की काय अशी शंका येते ! ◻

**निरभ्र :**
मधुमंगेश कर्णिक :
किमत ५ रु. :
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई :


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

**ब. मो. पुरंदरे**

**किमत : सात रुपये**

**राजहंस प्रकाशन**

# तेरावी
# राज्य नाट्य स्पर्धा
# गरीब विचारे स्पर्धक !

माणूसच्या गेल्या दोन अंकांतील सरकारी नाटच स्पर्धेवरील हिरीरीने लिहिलेले लेख वाचले. त्यातील शरद् गोखले यांची सरकारी कारभारावरील टीकाही मन:पूर्वक वाचली आणि हसू आले.

याहीपेक्षा जास्त हिरिरीने, गेल्या मे महिन्यात, मुंबई मराठी साहित्य संघाने भरविलेल्ना परिसंवादात ह्या स्पर्धांक प्रमुख श्री. साळवी ह्यांचेसमोर मुद्दे मांडले गेले होते. यविहयर्वण झाले होते. आधारानेही दिली गेली होती.

प्राथमिक फेरीच्या निमित्ताने हे एक क्षणभंगुर वादळ उठले असे अंतिम स्पर्धेच्या निमित्ताने आणखी एक वादळ उठेल.

अशा वादळाची सरकारी संचालकांना सवय झाली आहे. कागदी खेळ ह्यापलीकडे ते त्याला जास्त किंमत देत नाहीत आणि त्यांनी देऊही नये खाली मुंडी घालून, घालतील त्या नियमाविरूद्ध ब्र न काढता, स्पर्धेत वर्षानुवर्षे हौशी संस्था भाग घेताहेत नव्हे, त्यांची संस्था जोपर्यंत वाढत जात आहे तोपर्यंत आपल्या कागदी वाद्यांची फिकीर करण्याचे कारणच काय ?

वास्तविक हा सध्याचा महार राज्य नाटच स्पर्धेचा तेरावा नाटच महोत्सव म्हणजे नाटचस्पर्धेचा गाढ अनुभव सरकार जमा मुंबई राज्य नाटच महोत्सवाचे संचालन श्री. भट्ट हे करीत होते. त्यानंही सध्या एक हौशी. रसिक नाटककार श्री. राजाराम हुमणे हे संचलन करीत आहेत. त्यांच्या कानावर ह्या तक्रारी जात नसतील असा वेडगळ भ्रम कुणाचाही नाही. पण कार्यबाहुल्यामुळे त्यांना ह्या अडचणीकडे लक्ष द्यायला वेळ नसेल आणि दुसरे म्हणज सरकारी खाक्याप्रमाणे 'चालेल तितके दिवस चालू दे' ह्या संकेताप्रमाणे ह्या तक्रारीकडे ते दुर्लक्ष करीत असावेत.

साहित्यसंघातील तो परिसंवाद. हौशी नाटचसंघाचे श्री. रमेश चौधरी ह्यांच्याशी झालेली तात्कालिक चर्चा आणि येथील स्पर्धेतील बोचलेल्या गोष्टी ह्यांच्या आधी मला स्वत:ला व्यक्तिस: खालील सूचना कराव्याशा वाटतात—

संयोजनामध्ये सुसूत्रता. नागपूरच्या श्री. वसंत नानालांनी नाटचलेखनाब ल जी तक्रार केली आहे. त्यात मला विशेष स्वारस्य वाटत नाही. जिथे पुण्या-मुंबईच्या संस्था आणि नाटककार स्पर्धेच्या आदल्या दिवसापर्यंत एकामध्ये फेरफार करू शकतात आणि हे चालवून घेतले जात तिथे बरेच दिवस आधी तिसरा अंक श्री. दारव्हेकरांसारख्या प्रत्यक्ष नाटककरांनी लिहून हातावेगळा केला आणि तो संमत करून

घेतला ह्यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीही नाही. उलट परीक्षाकांचे पॅनेल नागपूरात संबंधित संस्थांना आधी कळू शकते आणि त्याविरुद्ध विध्वंसक का होईना पण त्या परिणामकारक हाल-चाली करू शकतात, ह्याचे आम्हाला आश्चर्य वाटते. ही जर माहिती आम्हाला कळू शकतो. तर कोठलेही परीक्षक मंडळ खिलाडूपणाने स्वीकार-ण्याचा शिष्टसंमत पायंडा मोडून, रंग-भूमीशी दूरान्वयानेही ज्यांचा संबंध येत नाही अशी वाङ्यीन परीक्षक मंडळी नेमण्याबद्दल आम्ही लोकांनी खळखळ केली असती. वास्तविक नाट्य संस्थांचे प्रवेशपत्रक संमत झाल्यावर त्यांचेकडे दहावारा संभाव्य नावे पाठवावीत आणि त्या नावावरील साधकबाधक प्रतिक्रिया लक्षात घेऊन परीक्षक मंडळ ठरवायला हरकत नसावी.

केंद्राकेंद्रात विषमता आढळते. काही केंद्रात पाच पास फुकट दिले जातात. काही ठिकाणी एकही दिला जात नाही काही ठिकाणी बंदिस्त नाट्यगृहात स्पर्धाभरवली जाते. तर काही ठिकाणी तात्पुरता रंगमंच तयार केला जातो की जिथे पहिल्या पहिल्या स्पर्धकांना काहीही सहकार्य मिळत नाही. सामान मिळत नाही आणि अशा विषम केंद्रा-तून आलेली नाटके अंतिम स्पर्धेला समान रंगभूमीवर फरक दाखवल्या-शिवाय रहात नाहीत.

पुण्याच्या प्रादेशिक स्पर्धेतील सर-कारी व्यवस्थेची व्यवस्थित चिरफाड श्री. शरद् गोखले यांनी केली आहेच. प्रथम ह्या स्पर्धेची सूत्रे समाज कल्याण खाते हलवीत असे. त्यावेळी श्री. मु. रा. लोणकर, श्री. पानसे ह्याच्यासारख त्या खात्यातील लोकसन्मुख अधिकारी, आमलेपणाने संस्थांच्या दैनंदिन समस्या सोडवीत. एका प्रात:काळी साक्षात्कार होऊन सूत्रे पब्लिसिटी ऑफिसकडे गेली. त्यावेळी गोंधळ होण्याची शक्यता होती. पण श्री. वावगावकरांसारख्या समय-सूचक अधिकाऱ्यामुळे तो प्रसंग टळला. त्या खात्याकडे ही सूत्रे स्थिरस्थावी होतात न होतात तोच ह्या वर्षी ती सूत्रे पुन: समाज कल्याण खात्याकडे गेली. संबंधित अधिकाऱ्यांच्या चमत्का-रीक मनोवृत्तिमुळे यंदा फार त्रास झाला. ह्यांच्याचपैकी एका बेजबाबदार अधिकाऱ्याने एका नाटकाचे प्रारंभी पेटत्या धूपदाणींमध्ये सिगारेटचे थोटूक टाकल्याची बातमी आहे.

वास्तविक भाग घेणाऱ्या संस्थांना दोन पूर्णोत्सवाच्या पत्रिका मान म्हणून दिल्या जातात. यंदा प्रथमत: तो मान नाकारला गेला. वरपर्यंत तक्रार केल्या-व्यवस्था झाली पण फार मागच्या बाजूला. वृत्तपत्र सभीक्षकांची दैना श्री. गोखले यांनी वर्णन केली आहेत. वास्त-विक ह्या महोत्सवाच्या मानकऱ्यांना बाजूला ढकलून देऊन, रंगभूमीकडे दुर्लक्ष करणाऱ्या, फायली फायलीची प्रकरणे चविष्टपणे चर्चिणाऱ्या सरकारी खात्यात पासांची खिरापत का वाटली जाते हा शोध घेण्याचा विषय आहे. पुढच्या रांगामध्येसुद्धा रसिक अधि-काऱ्याच्या जवळ एखादा बेजबाबदार,

उथळ प्रवृत्तीचा, कर्मचारी असल्यास दोघांनाही सहन करावा लागतो. सरकार, नाट्य महोत्सवाची सूत्रे कोणत्या खात्याकडे सोपवते ह्याच्याशी नाट्य संस्थाचा सुतराम संबंध नाही. फक्त ' आपणच शहाणे ' अशा फालतू प्रौढीत त्या खात्याने महोत्सव चालू ठेवल्यास सर्वांनाच त्रास होतो.

असाच एक सदैव मनस्ताप सहन करायला लावणारा मुद्दा म्हणजे स्पर्धेतील नाटक सादर करावयाचा क्रमांक. हे क्रमांक म्हणे मुंबईत लावले जातात. क्रमांक लावताना संबंधित नाट्यसंस्थांना बोलावण्याचा सामान्य शिष्टाचार सरकार कधीच पाळीत नाही. मूलभूत संकेतच पाळण्याचा विचार सरकारच्या मनाला शिवत नसल्यामुळे, त्या संस्थांच्या अडचणींचा विचार करण्याचीही गरज सरकारला कधी भासत नाही. क्रमांक लावायचा निकष ह्या त्या कचेरीखेरीज दुसऱ्या कोणालाही माहित नसतो. त्या त्या केंद्रातून एकंदर सादर होणारी नाटके, त्यांची संख्या आणि त्या यादीतील विवक्षित संस्थेचे स्थान हे न कळवता फक्त त्या संस्थेने आपले नाटक सादर करावयाचा दिनांक कळवला जातो. त्या संस्थेला अपरिहार्य अडचण असल्यास तिने स्वतःच्या हिंमतीवर लोकांना विचारावे, नशीब जोरावर असल्यास इतर संस्थांच्या मेहेरबानीने दिनांक बदलून घ्यावा, नाहीतर स्पर्धेतून काढता पाय घ्यावा. क्रमांक मुंबईच्या ऑफिसमध्ये बसून न लावता त्या त्या केंद्रावर संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींसमक्ष लावले गेले तर अपरिहार्य अडचणींचा विचार केला जाऊन सर्वसंमत यादी तयार होईल. पण मग मुंबईच्या केंद्रस्थानाचे महत्त्व नष्ट होईल आणि स्पर्धा सुरळीत चालतील ! ही साक्षात भीती संचालकांना वाटत असली पाहिजे. तसेच काही विशिष्ट संस्थांच्या अडचणींचा विचार करण्याचा हक्कही मुख्य संचालनालयाकडून हिरावून घेतला जातो. अंदरकी बात राम जाने. पण ह्याबाबतीतील विचार निर्भीडपणे संबंधित अधिकाऱ्यापर्यंत पोचूनही त्याचा काही उपयोग झाला नाही असे दिसते. तेव्हा आज ना उद्या केव्हातरी, कधीतरी, त्या त्या केंद्रातील नाटकांचे क्रमांक, स्पर्धेत भाग घेणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत लावले जावेत हा सुविचार सरकारला पटो.

---


**पूर्णिया**

**अनिल अवचट**

**सहा रुपये**

**राजहंस प्रकाशन**

दुसरा एक सुविचार पुण्याच्या महाराष्ट्रीय कलोपासकाचे श्री. राजाभाऊ नातू ह्यांनी वेळोवेळी मांडला आहे, पण त्याचा विचार करण्याची सुबुद्धी सरकारला अजून होत नाही. आजपर्यंतच्या सर्व केंद्रातील निर्णयांची एक संकलीत यादी तयार करावी. त्यात सातत्याने अंतिम फरीत, किमान पाच–सात वर्षे येणाऱ्या संस्थांची यादी वेगळी तयार करावी आणि त्यांची वेगळी स्पर्धा ठेवावी. फक्त त्या स्पर्धेत किमान अपेक्षित गुण न मिळाल्यास, त्या स्पर्धेत दाखल होण्याचा मान त्या संस्थेला गमवावा लागेल आणि त्या संस्थेला पुढील वर्षापासून प्राथमिक, सामान्य प्रादेशिक फरीत भाग घ्यावा लागेल. ह्या दंडकामुळे त्या संस्थेला 'अ'वर्गीय यादीत रहाण्याची धडपड कायम करावी लागेल. आणि एक विशिष्ट दर्जा आपोआपच संभाळला जाईल.

यंदाचा किमान पंचवीस गुण मिळवण्याचा नियमही अत्यंत अभिनंदनीय आहे. फक्त त्याचे पालन कसोशीने आणि काटेकोरपणे व्हावे अशी न्याय्य इच्छा.

अशा सूचनांची वासलात काय लागणार आहे ह्याची पुरती जाणीव असूनही सूचना मांडायचे धाडस केले आहे. कारण कच्च्या धाग्याला लोंबकळणारी वेडी आशा, जिच्या आधारावर, कुठल्याही नियमांच्यापुढे मान तुकवून, नाट्यवेडा कलावंत, स्पर्धेत वर्षानुवर्षं भाग घेतो आहे.

अनंत ओक

## कलोपासक डिसेंबर

# नाटक

ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील एकांकिकांच्या निराशाजनक प्रयोगांच्या पार्श्वभूमीवर डिसेंबर मधली एकांकिका प्रयोग दृष्ट्या खूपच चांगली वाटली. चि. त्र्यं. खानोलकर यांची 'नाटक' या नावाची एकांकिका कलोपासकांनी सादर केली. दृष्टी गेलेला आणि मरणघटका जवळ आल्याची जाणीव असणारा एक म्हातारा बाप. अखेरच्या क्षणी मुलाची भेट होईल या आशेवर जगतो आहे. पण मुलाने आत्महत्त्या केल्याचे सून सांगत नाही. नवऱ्याच्या ऐवजी ती आपल्या प्रियकराला घरी आणते. तू नवरा आहेस असे नाटक कर म्हणून सांगते. दोलायमान अवस्थेत तो प्रियकर ते नाटक करण्याचे मान्य करतो, पण अखेरीस सत्यकथन करून एकांकिकेचा शेवट धक्कास्पद करतो. म्हाताऱ्या बापाला दृष्टी नसल्याने या खोटया नाटकातून अखेरच्या क्षणी मिळणारे सुख हिरावून घेतले जाते. खानोलकरांच्या एकांकिकेचा विषय नाट्यपूर्ण आहे. पण एकांकिकेचे लेखन मात्र आशयघन होऊ शकलेले नाही. मूळ नाट्य-प्रसंगाच्या द्वारा व्यक्तिमनांचा नाटककाराने घेतलेला वेध हा केवळ शब्दांच्याच पातळीवर राहिला; नाट्यकृतीतून तो उमलून येऊ शकला नाही. उत्तरार्धात तर लेखनाला भावविवश रूप आले.

एकांकिकेतील विषयाचे गांभीर्य ध्यानी घेऊन बाबा देसाई यांनी प्रयोग नेटका बसवला होता. म्हाताऱ्या बापाची भूमिकाही त्यांनी स्वतःच केली होती. अभिनेता आणि दिग्दर्शक अशा दुहेरी भूमिका त्यांनी चोख बजावल्या. त्यांच्या चेहऱ्याची ठेवण ही म्हाताऱ्याची भूमिका वठवण्यास यथायोग्य आहे. मागेही त्यांनी 'सामना' एकांकिकेत आणि 'कालायतस्मैनमः' नाटकात म्हाताऱ्याचीच भूमिका केली होती. म्हाताऱ्याच्या भूमिकेला जशी विशिष्ट प्रकारची चेहेरेपट्टी त्यांना अनुकूल आहे, तसेच त्यांचे संथ लयीतले बोलणेही आहे! 'नाटक' एकांकिकेत त्यांच्या मागील दोन्ही भूमिकांच्या बोलण्याच्या पद्धतीची याद अधूनमधून येत होती. विशेषतः बोलण्याची लय आणि वाक्यांचे विशिष्ट प्रकारचे शेवट यामध्ये जे साम्य जाणवले. या गुणी नटाने आता या म्हाताऱ्याच्या त्याच त्या प्रकारच्या भूमिकांतून मुक्त होऊन नवीन आव्हानात्मक भूमिकांचा स्वीकार करावा, असे वाटते. धनश्री भोगले यांनी सुनेचे (अरुंधतीचे) काम यथा-योग्यपणे केले. त्यांचा आवाज बारीक आणि एकसुरी वाटला. प्रसंगानुरूप भावनाभिव्यक्तीसाठी त्या आवाजातील चढउतारांचा वापर झाला नाही, मात्र त्यांनी मुद्राभिनयाने भूमिकेचा तोल ढळू दिला नाही. बाबा देसाईंच्या भूमिकेला समतोल राखण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सुहासचे म्हणणे नायकाचे काम करणारे विजय सबनीस आणि माळी झालेले मोहन रानडे अगदीच सुमार होते. रानडे यांना एकांकिकेत फारसा वाव नव्हताच. पण सबनीसांना बऱ्यापैकी वाव असूनही त्याचा योग्य तो फायदा त्यांनी करवून घेतला नाही. त्यांच्या आडमाप उंचीमुळे आलेले अवघडलेपण अभिनयालाही अवघड झाले, परिणाम हीन झाले.

एकांकिकेला दिलेले पार्श्वसंगीत, एकांकिकेच्या प्रारंभीची यथार्थ प्रकाश योजना आणि पात्रांची विरचना इत्यादी गोष्टी विशेष लक्षणीय होत्या. आणखी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो, तो म्हणजे बाबा देसाईंच्या रंगभूषेचा. सर्वसाधारणपणे म्हाताऱ्याचे टक्कल आणि मागे सोडलेले पांढरे केस अनेकदा दाखवले जातात. पण वयपरत्वे रापलेल्या गेलेल्या चेहऱ्यावरचे जुनेपण (कातडीच्या रंगांचे भिन्नपण) रंगभूषेने दाखवण्याची पद्धत फारच कमी आहे. रंगभूषेतून हा बारकावा व्यक्त केल्याबद्दल भावे या रंगभूषकाला आणि दिग्दर्शकाला धन्यवाद!

वि. भा. देशपांडे

## श्री. वैद्य यांना आव्हान

पृष्ठ ८ वरून

म्हणण्यानुसार, मी आपल्या 'अमेरिका-प्रणीत धारणेप्रमाणे–धोरणाप्रमाणे या मुस्लिम समाजसुधारकांचे संबंध इतर पुरोगामी लोकशाही चळवळीशी येऊ नयेत यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली ! आणि शहा महाशयांची किमया अशी की त्यांनी मुस्लिम सत्यशोधकां-साठी मित्र शोधले ते नेमके हिंदु चातुर्वर्ण्यवाद्यांमध्ये ! म्हणजे मुस्लिम सनातन्यांशी लढण्यासाठी मुख्य साहाय्य कोणाचे ? तर हिंदु सनातन्यांचे !

वर उद्‌धृत केलेली श्री. वैद्य यांची सर्व विधाने धादांत खोटी आहेत. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची कल्पना सर्वस्वी श्री. हमीद दलवाई आणि त्यांचे पुण्यातील आद्य सहकारी, विशेषत: श्री. सय्यदभाई, यांची होय. त्या चळवळीस महाराष्ट्रव्यापी आणि लढाऊ स्वरूप देण्याचे श्रेयही संपूर्णत: त्यांचे आहे. ते श्रेय माझ्या पदरात टाकून श्री. दलवाई आणि त्यांचे इतर सहकारी व मी (शहा) यांच्यात दुरावा निर्माण कर-ण्याचा नेहमीचा कम्युनिस्टी प्रयत्न श्री. वैद्य यांनी करू नये, कारण तो यशस्वी होण्याचा सुतराम संभव नाही.

ही चळवळ श्री. वैद्य यांच्या पक्षा-पासूनच नव्हे तर सर्वच राजकीय पक्षा-पासून दूर ठेवण्याचा निर्णयही श्री. दलवाई व त्यांच्या मुस्लिम सहकाऱ्यांचा आहे. मुस्लिम समाजाच्या प्रबोधनाच्या दृष्टीने नक्षलवाद्यांपासून शिवसेनेशी **बिनराजकीय आणि पक्षातील भूमिके-वरून** सहकार करावयाचा व त्याच-बरोबर मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या संघटनेवर किंवा कार्यपद्धतीवर कोण-त्याही प्रकारच्या पक्षीय राजकारणाचा प्रभाव पडू द्यावयाचा नाही हा निर्णयही श्री. दलवाई व त्यांच्या मुस्लिम सह-काऱ्यांचा आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना होण्यापूर्वी अनेक वर्षे श्री. दलवाई समाजवादी पक्षाचे क्रियाशील सदस्य होते. इतर कोणत्याही आणि विशेषत: भारतीय कम्युनिस्ट पक्षापेक्षा समाजवादी पक्ष अधिक तत्त्व-निष्ठ आणि सार्वजनिक नीतिमत्तेस जपणारा आहे अशी त्यांची व माझीही धारणा आहे. तरीही पक्षीय राज-कारणाच्या चौकटीत राहून प्रबोधनाचे कार्य नेकीने करता येणार नाही या अनुभवजन्य जाणीवेमुळे श्री. दलवाई यांनी समाजवादी पक्षाशी आपले औप-चारिक संघटनात्मक संबंध जवळ जवळ सहा वर्षापूर्वीच तोडले. पंचवीस वर्षाहून अधिक काळापासून माझेही मत तसेच आहे, आणि म्हणूनच मुस्लिम सत्य-शोधक मंडळाची वर उल्लेख केलेली भूमिका मला संपूर्णत: मान्य आहे. किंबहुना मुस्लिम समाजाच्या नव्हे तर एकूण भारतीय समाजाचाही प्रबोधना-बद्दल तात्त्विक भूमिका श्री. दलवाई यांच्यासारखीच असल्यामुळे त्यांनी सुरू केलेल्या चळवळीच्या पाठीशी मी पहिल्यापासून उभा आहे. श्री. वैद्य यांना अभिप्रेत असलेल्या इतर पुरोगामी

लोकशाही चळवळीपासून म्हणजे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या संधीसाधू राजकारणापासून मुस्लिम सत्यशोधक मंडळास लांब ठेवण्याचे श्रेय, तसे करणे मला कितीही प्रिय असले तरी, मी घेऊ शकत नाही.

श्री. वैद्य यांच्या पक्षातल्या अनेक मान्यवर सदस्यांना ही भूमिका समजू शकते, असे मला वाटते. कारण काही वर्षापूर्वी या पक्षाचा महाराष्ट्रशाखेने श्री. दलवाई यांच्या निषेधाचा ठराव केला तेव्हा श्री. डांगे यांनी खाजगीत त्याबद्दल नापसंती व्यक्त केली होती हे मला माहीत आहे. एवढेच नव्हे तर श्री. सय्यद झहीर यांच्यासारख्या सच्च्या मानवतावादी कम्युनिस्टानेही श्री. दलवाई यांच्या कार्यास यश चिंतून, १९७१ च्या डिसेंबर महिन्यात आम्ही दिल्लीला घेतलेल्या पुरोगामी मुस्लिम परिषदेस उपस्थित राहण्याचे कबूल केले होते. आयत्यावेळी प्रकृती बिघडल्यामुळे ते येऊ शकले नाहीत हे खरे, परंतु त्यांचे आशिर्वादात्मक पत्र मी अजून जपून ठेवले आहे. श्री. वैद्य यांना हे कदाचित माहीत नसेल; परंतु दिल्ली परिपदेनंतर थोड्याच दिवसात पुण्यात घेतलेल्या मुस्लिम महिला परिषदेस श्रीमती मालिनी तुळपुळे उपस्थित राहिल्या होत्या आणि परिषदेनंतरच्या जाहीर सभेत त्यांनी भाषणही केले होते, हे तरी वैद्यमहाशयांना आठवावयास पाहिजे होते. या परिषदेनंतरच्या दोन वर्षात इंडियन सेक्युलर सोसायटी किंवा मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या भूमिकेत किंवा कार्यपद्धतीत काडीचाही बदल झाला नाही.

या संदर्भात दुसरी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेत किंवा त्यांच्या कार्यास गती मिळवून देण्यात माझा वाटा फार मर्यादित आहे, हे वर सांगितलेच आहे. परंतु या मर्यादित वाटचाचे स्वरूप समजून घेतल्यास वैद्य महाशयांचेच नव्हे तर त्यांच्या पक्षासही ' प्रतिगामी ',' दुरुस्तवादी ' किंवा ' इंदिरा काँग्रेसचे दलाल ' म्हणून ओळखणाऱ्या आमच्या इतर स्वप्रमाणित ' क्रान्तिकारक ' टीकाकारांचेही थोडे प्रबोधन होईल. मुस्लिम सत्यशोधक मंडळ मुस्लिम समाजाच्या ज्या वर्गामध्ये कार्य करते त्यांच्यात उच्च शिक्षणाचा नव्हे तर माध्यमिक शिक्षणाचाही प्रसार फार अल्प प्रमाणात झाला आहे. गरीब व अनपढ मुसलमानांच्या आशाआकांक्षा, त्यांच्या जीवनातली दुःखे अशरफ मुसलमान व सर्व राजकीय पक्ष यांच्याकडून होणारी त्यांच्या प्रश्नांची उपेक्षा सर्व गोष्टींना अखिल भारतीय पातळीवरून, म्हणजे ओघाने इंग्रजीत वाचा फोडणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच पुरोगामी असण्याचा टेंभा मिरवणाऱ्या परंतु वस्तुतः कमालीचे स्वार्थी व संधीसाधू असणाऱ्या सुखवस्तु आणि उच्चपदस्थ मुसलमान नेत्यांच्या कानापर्यंत या गोष्टी पोचविण्याचाही इंग्रजीत लिखाण करणे हा एकमेव मार्ग आहे.

माझ्या कार्याचा हा एक महत्त्वाचा भाग. या प्रयत्नास आतापर्यंत प्रतिसाद

मिळाला असल्यास तो समाजवादी पथ, सर्वोदयी कार्यकर्ते आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस व प्रा. फैजी, प्रा. आलम खुंदमिरी आणि प्रा. मोईन शाकीर यांच्यासारख्या काही मुस्लिम विद्वानांकडून. (प्रा. शाकीर एकेकाळी कम्युनिस्ट पक्षाचे कार्डधारक सभासद होते व अजूनही बऱ्याच अंशी मार्क्सवादी हे वैद्यमहाशयांच्या माहितीसाठी मुद्दाम सांगितले पाहिजे.) सर्वसामान्य 'शिया' हिंदु–म्हणजे स्वतःस उदारमतवादी किंवा मानवतावादी समजणारे आणि हिंदुजातीयवादावर कडाडून टीका करणारे; परंतु मुसलमान समाज अनेक दशके आजच्यासारखाच मागासलेला राहील, त्याचे आधुनिकीकरण प्रत्येक हिंदु सेक्युलर होईपर्यंत शक्य नाही, म्हणजेच मुस्लिम समाज तत्त्वःच दुय्यम प्रतीचा समाज आहे असे समजणारे हिंदु–आणि मार्क्सचा वारसा सांगणारे सर्व पक्ष किंवा मुंबई प्रदेश काँग्रेस यांच्याकडून, तसेच तथाकथित पाश्चात्यविद्याविभूषित अशरफ मुसलमानाकडून आमची आतापर्यंत तरी हेटाळणीच होत आली आहे. याबद्दल आम्हास खंत वाटत नाही, हेही मी येथे स्पष्ट करू इच्छितो. कारण या पक्षांचा किंवा वर्गांचा आम्हास पाठिंबा मिळाला तर आमच्या भूमिकेत किंवा कार्यपद्धतीत काही चुकत तर नाही ना अशी आम्हास शंका येऊ लागेल.

मुस्लिम सत्यशोधक मंडळातील माझ्या कार्याचे दुसरे अंग तात्त्विक स्वरूपाचे आहे. मानवी संस्कृतीच्या इतिहासात आणि आजच्या युगात धर्माचे स्थान, त्याचा रोहिक जीवनाशी असलेला (किंवा नसलेला) संबंध आणि धर्माची निर्भीडपणे शास्त्रीय चिकित्सा करण्याची आवश्यकता, अशी त्याची थोडक्यात रूपरेषा सांगता येईल. 'धर्माची चिकित्सा ही सर्व चिकित्सेची सुरुवात होय,' असे मार्क्सने म्हटले आहे. म्हणून माझी अशी अपेक्षा होती, की स्वतःस मार्क्सवादी म्हणविणारे राजकीय पक्ष आणि तत्सम संघटना मार्क्सच्या या विधानाची आठवण ठेवून स्वतःचे धोरण व कार्यक्रम वर्षात एखादवेळ तरी तपासतील. परंतु या सर्व पक्षांनी यात वैद्य महाशयांच्या पक्षाचाही समावेश आहे–कमालीचा संधीसाधूपणा दाखविला आहे. मुस्लिम समाजातील सुशिक्षित मंडळींनीही नेहमी असेच दुटप्पी धोरण स्वीकारले आहे याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आणि म्हणून हे काम मला पत्करावे लागले. यासाठी कोठल्याही चळवळीपेक्षा मला अधिक प्रिय असलेल्या विज्ञानाच्या तत्त्वज्ञानासारख्या विषयाकडे दुर्लक्ष करावे लागले आहे. एवढेच नव्हे तर काही अगदी जवळच्या मित्रांचा आणि भारत सरकारचाही रोष पत्करावा लागला आहे. उदाहरणार्थ, माझ्या अनेक नवमानवतावादी मित्रांना आणि श्री. मीनू मसानी यांच्यासारख्या उदारमतवादी सहकाऱ्यांना माझे हे कार्य पसंत नाही. भारत सरकारचा रोश इतका की दोन वर्षापूर्वी पुण्यात झालेल्या आमच्या मुस्लिम महिला परिषदेस पंतप्रधान

श्रीमती इंदिरा गांधी यांनी शुभेच्छा संदेशसुद्धा पाठविला नाही. आता आम्ही कोणत्याही राजकीय नेत्याकडून संदेश मागवीत नाही; त्यांनी देऊ केले तरी त्यांचे आशीर्वाद आम्हास नको आहेत.

हे सर्व सांगण्याचे कारण एवढेच की जी गोष्ट श्री. मिनू मसानींसारख्यांना मान्य नाही ती 'अमेरिकन धारणा-प्रणीत' कशी असू शकेल याचा श्री. वैद्य यांनी थोडा विचार करावा. श्री. मसानी यांना मान्य असलेल्या गोष्टी अमेरिकन धारणाप्रणीत असतात असे मला अजिबात सुचवावयाचे नाही; परंतु वैद्यमहाशयांच्या चिखलफेकी तत्त्वज्ञानानुसार असे असावयास पाहिजे. मात्र त्यांनी हेच तत्त्वज्ञान श्री. ब्रेझनेव्ह यांच्या धोरणासही लावले पाहिजे.

दुसरे असे की माझे 'योग्य ठिकाणचे योग्य संबंध' याचा बुझ्वॉ पद्धतीने सूचक उल्लेख न करता वैद्यमहाशयांनी खऱ्या कम्युनिस्टाला साजेल अशा स्पष्ट भाषेत सांगितले असते तर बरे झाले असते. परंतु त्यांच्याकडून अशी अपेक्षा करणे चूक ठरेल. तथापी स्पष्ट वक्तेपणा आणि वैचारिक काटेकोरपणाबद्दलचा आग्रह या मार्क्सच्या गुणांना स्मरून मीच वैद्यमहाशयांना जमले नाही ते स्पष्ट करू इच्छितो.

श्री. वैद्य यांना असे सुचवावयाचे आहे, की मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना भारत सरकार किंवा सी. आय. ए. या संघटनेच्या प्रेरणेने खाली आहे, आणि त्याचे कार्य सतत वाढत गेले तेही तिच्याकडून मिळत असलेल्या आर्थिक सहाय्याने. श्री. वैद्य यांची हिंमत असेल तर त्यांनी हे विधान कोठलेही आडवळण न घेता छापील स्वरूपात करावे. म्हणजे मला त्यावर कायदेशीर किंवा इतर उपाय योजना करता येईल. त्यांना तसे काही अभिप्रेत नसले, आणि त्यांच्याठायी सुसंस्कृत माणसाकडून अपेक्षित असलेला बौद्धिक प्रामाणिकपणा असेल, तर त्यांनी तसा छापील खुलासा करावा. यापैकी कोणताच मार्ग त्यांनी पत्करला नाही तर ते गल्लीतल्या कुलंगी कुत्र्यासारखे भुंकणारे पण भेकड आहेत असा निष्कर्ष काढणे भाग पडेल.

हे आव्हान इतक्या कठोर भाषेत देण्याचे कारण असे की कम्युनिस्टांना सौम्य भाषा समजत नाही असा माझा गेल्या एकतीस वर्षांचा अनुभव आहे. उदाहरणार्थ १९४४ मध्ये आणि १९५३ मध्ये असे दोनदा त्यांनी मला मारामारी करण्यास भाग पाडले आहे. या दोन्ही घटना पुण्यात घडल्या. तिसरी घटना थोड्या वेगळ्या स्वरूपाची, म्हणजे वैद्यमहाशयांच्या प्रस्तुत लेखणी–पराक्रमासारखी आहे. श्री. सुधीर बेडेकर यांच्या मागोवा या मासिकाच्या ऑगस्ट १९७३ च्या अंकात, नाव न घेता माझे चारित्र्यहनन करण्याचा असाच भेकड प्रयत्न नक्बी नावाच्या एका इसमाने केला आहे. याशिवाय न्यु एज, लिंक पेट्रिअट इत्यादी कम्युनिस्ट किंवा त्यांच्या सहप्रवासी नियतकालिकातून हा प्रकार गेली दहावर्षे अधूनमधून चालूच असतो.

कम्युनिस्ट आणि जमाएत-रा-इस्लामी यांच्यात याबाबतीत काडीचाही फरक नाही. या संदर्भात खालील गोष्ट बोधप्रद ठरण्याचा संभव आहे म्हणून नमूद करतो.

१९६९ च्या ऑक्टोबर महिन्यात एका अखिल भारतीय परिसंवादात श्री. वैद्य यांच्या पक्षातील एका नामवंत सिद्धांतबाज (म्हणजे थिऑरेटिशन) माझ्याबरोबर होते. कम्युनिस्टांच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी माझ्याशी वाद करताना सी. आय. ए. चा ओढून ताणून उल्लेख केला. आणि त्याचबरोबर मला मार्क्सचे डाअलेक्टिक्स शिकविण्याचा बालिश प्रयत्न केला.' बालिश ' म्हणण्याचे कारण असे की हे विद्वान शाळेत शिकत असताना मी, मार्क्स एंगल्स-लेनिन यांच्या या विषयांवरच्या सर्व लिखाणाचे परिशीलन करून चुकलो होतो, आणि त्याकरिता आवश्यक असलेले–परंतु मार्क्सच्या मृत्युनंतर जन्मास आलेले–अणुविज्ञान आणि सापेक्षतावाद हे सुद्धा आधुनिक गणिताचा अभ्यास करून समजावून घेतले होते.

सी. आइ. ए. च्या बाबतीत माझी भूमिका प्रांजल होती, आणि आजही तशीच आहे. काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम या संस्थेस अनुदान देणाऱ्या अनेक प्रतिष्ठानांपैकी दोन प्रतिष्ठाने सी. आइ. ए. शी. संबंधित होती. त्यांच्याकडून काँग्रेसला मिळालेले अनुदान तिच्या एकूण उत्पन्नाच्या जेमतेम दहा टक्क्याइतके होते, आणि काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांना त्याची कल्पनाही नव्हता. (या ठिकाणी विख्यात कवी स्टीव्हनस्पेंडर यांना देखील ही वस्तुस्थिती माहीत नव्हती याचे मी स्मरण देऊ इच्छितो) परंतु ही गोष्ट माहीत झाल्याबरोबर या गोष्टीस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यास कार्यकारणीने तावडतोब सेवामुक्त केले आणि संघटनेची संपूर्ण पुनर्रचना केली. इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम या भारतीय संस्थेच्या कोणत्याही सदस्यास ही गोष्ट तोपर्यंत माहीत नव्हती. हा सर्व इतिहास १९६७ मध्ये दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या ' वीकएण्ड रिव्हयू ' या साप्ताहिकात एक विस्तृत लेख लिहून मी जाहिररीत्या सांगितलेला होता. त्याचबरोबर सी. आइ. एच्या कृपेस नकळत पात्र झालेल्या भारतातील जवळजवळ वीस संस्थाची यादीही मी दिली होती. यात भारतसरकारचे नभोवाणी खाते आणि काही विद्यापीठे तर होतीच; परंतु सोव्हिएट युनिअन व पक्ष म्हणून जन्मास आल्यापासून त्याचा पंचमस्तंभीय प्रचारक म्हणून कार्य करीत आलेल्या, भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या लाडक्या श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांच्या इंडियन सोसायटी फॉर इंटर नॅशनल लॉ या संस्थेचाही समावेश त्यात होता.

हे सर्व सांगून झाल्यावर त्या कम्युनिस्ट विचारवंतास मी विचारले की, ' कारे बाबा, आमच्या नकळत आम्हास सी. आइ. ए. चे थोडे पैसे मिळाले हे खरे; तथापी आमच्या धोरणावर त्यामुळे किंचीतही परिणाम झाला

नाही, एवढेच नव्हे तर ही गोष्ट माहीत झाल्यावर ज्या अधिकाऱ्याने ही व्यवस्था केली होती त्याला, त्याने केलेले प्रामाणिक आणि निष्ठावंत कार्य आड येऊ न देता आमच्या आंतरराष्ट्रीय कार्यकारिणीने तावडतोब सेवामुक्त केले; तरीही आम्ही 'अमेरिकन एजंट'! परंतु तुमचा पक्ष आपल्या स्थापनेपासून सोव्हिएट युनियनकडून कोटयावधी रुपये घेत आला, स्टालिन–हिटलर करारापासून रशियन लेखकांच्या छळापर्यंतच्या सर्व गोष्टींचे समर्थन करता, आणि तुमचे नेते रशियन पैशाने उठल्यासुठल्या परदेशी वाऱ्या करतात; तरी तुम्ही राष्ट्रनिष्ठ आणि तुमचे चारित्र्य शुद्ध, हे कसे काय? की हा सुद्धा डायलेक्टिक्सचाच एक प्रकार आहे?

यावर तो कम्युनिस्ट विचारवंत मोकळेपणाने (खरे म्हणजे निर्लज्जपणाने) हसला आणि म्हणाला, 'ए. बी. इट इस ऑल ए मॅटर ऑफ बिइंग कॉट!' म्हणजे कम्युनिस्टांच्या दृष्टीने हा राष्ट्रनिष्ठेचा किंवा नैतिकतेचा प्रश्न नसून केवळ चलाखीचा प्रश्न आहे. पण हे तितके खरे नाही, एका अर्थाने हा भारत सरकारच्या मूर्खपणाचा किंवा संधीसाधूपणाचाही प्रश्न आहे. कारण जे सरकार सर्व पुरावा जवळ असून अशा पक्षास संरक्षण देते, एवढेच नव्हे तर त्याला सार्वजनिक जीवनात मानाचे स्थान मिळवून देते ते सरकार एकतर निर्बुद्ध असले पाहिजे नाहीतर स्वतःच्या स्वार्थापायी देश विकावयास निघालेले असले पाहिजे.

द्रव्यसहाय्याच्या संदर्भात दुसरी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. इंडियन सेक्युलर सोसायटी आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळ यांचा इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम किंवा इंटर नॅशनल असोसिएशन (पूर्वीचे काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम या संस्थांशी काहीही संबंध नाही. वैद्यमहाशयांना असा संबंध आहे असे वाटणे स्वाभाविक आहे, कारण त्यांच्या पक्षाच्या इस्कस, आयटक, शांतता समिती, पुरोगामी लेखक मंडळ, इत्यादी वेगवेगळया मुखवटयाखाली संघटना आहेत, त्या कम्युनिस्ट पक्षाच्या दास आहेत. त्या सर्वांना एकाच ठिकाणाहून आर्थिक साहाय्य मिळत असल्यामुळे श्री. वैद्य यांनी इतरांच्या बाबतीतही अशीच शंका घेतली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे नाही. परंतु इंडियन सेक्युलर सोसायटी आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कोठल्याही संस्थेशी असे संबंध नाहीत. त्यांना आतापर्यंत मिळालेले सर्व अनुदान या देशाच्या नागरिकांकडूनच मिळालेले आहे. बाहेरून एक पैसाही आलेला नाही. त्याचबरोबर मी हेही स्पष्ट करू इच्छितो की आम्हास कोणत्याही प्रकारच्या अटीशिवाय कोठूनही अनुदान मिळाले, मग ते अमेरिका, रशिया, चीन, सौदी अरबस्तान, लिबिया, कोठूनही का येईना– तर आम्ही ते आनंदाने, परंतु उघडपणे स्वीकारून; कम्युनिस्टासारखे गुप्तपणे नाही.

या संदर्भात मी वैद्यमहाशयांना दुसरे एक जाहीर आव्हान देतो. माझा संबंध असलेल्या व वर उल्लेख केलेल्या सर्व संस्थांचे हिशेब वाटेल तितक्या बारकाईने तपासण्याची, आणि त्या संस्थांच्या कार्याचे वाटेल तितके दिवस आमच्या बरोबर बसून निरीक्षण करण्याची वैद्यमहाशय सांगतील त्या व्यक्तीस आम्ही एका अटीवर सर्व सवलतीसह परवानगी द्यावयास तयार आहोत. ती अट अशी की: वैद्यमहाशयांनी त्यांच्या पक्षाचे आणि त्यांच्या अंकित संघटनाचे हिशेब आणि कार्यपद्धपद्धती तपासण्यासाठी आम्हास तशीच सवलत मिळवून द्यावी.

हे आव्हान स्वीकारण्याची वैद्यमहाशयाची हिंमत नसेल तर त्यांनी यापुढे फजूल बकवास बंद करावा असा मी त्यांना मित्रत्वाचा सल्ला देईन.

श्री. वैद्य यांनी उपस्थित केलेल्या सैद्धांतिक आणि धोरण विषयक मुद्यांची चर्चा करणे मला अधिक आवडले असते. अशी चर्चा प्रामाणिक मार्क्सवाद्याशी होऊ शकचे. परंतु श्री. वैद्य यांच्यासारख्या कम्युनिस्टाशी ती शक्य नाही. कारण जो पक्ष मुस्लिम लीगशी संसार करतो, अलिगड विद्यापीठ कायद्याबद्दल काही आठवड्यातच आपली भूमिका साफ बदलतो, आणि ज्या पक्षाचा श्री. इशाक सम्बली सारखा लोकसभेचा मुस्लिम सदस्य मुस्लिम लीग आणि इतर सनातनी मुस्लिम सदस्याबरोबर मध्यपूर्वेतील एका मुस्लिम देशात तयार होत असलेल्या प्रेषित यहमंदाच्या जीवनावर आधारलेल्या चित्रपटाविरुद्ध बंदी घालावयास भारत सरकारला आग्रह करतो, त्या पक्षाच्या प्रतिनिधीबरोबर मुसलमानांच्या अंधधर्मश्रद्धा किंवा जातीयवादावर चर्चा करणे म्हणजे वेळचा जाणूनबुजून अपव्यय करणे होय. अशा पक्षाने हिंदूंच्या जातीय वादाविरुद्ध आवाज उठविणे हा सुद्धा करमणुकीचा विषय होय. आणि हिंदु सनातन्याच्या सहाय्याने जातीय किंवा सनातनी मुसलमानांना लढा देण्याचा त्याने आमच्यावर आरोप करणे हा तर 'चोराच्या उलटया बोंबा' सारखाच प्रकार होय. वैद्यमहाशयांनी मार्क्सचे लिखाण निदान वरवर तरी वाचले आहे की नाही याची मला जबरदस्त शंका आहे. ¤ ¤ ¤

---


**पुरंदरच्या बुरुजावरून**

ब. मो. पुरंदरे

मूल्य : चार रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

यंदाचे महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिक मिळवणारे
आमचें एक विशेष प्रकाशन

डॉ. सुधीर फडके

# कोठे आणि कधीतरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**